दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २३० I बुधवार ३ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



‘सहजयोग’
भाग ७०

**धर्मांधता...** सहजयोग म्हणजे काय. आणखीन, आपण धर्माच्या नावावर काहीही करत असतो. जे सुचेल ते. माणसा मध्ये धर्म जागृत आहे, त्याला धर्माची भावना आहे, धर्माबद्दल विचार आहे, परमेश्वरा बद्दल विचार आहे, आणि संतजनांनी जे सांगितलेलं आहे, त्या रस्त्यावरही आपण हळू हळू पुढे जात आहोत. पण तरी सुद्धा पुष्कळदा आपल्या लक्षात येत नाही की आपण किती घोड चुका करत असतो. फार मोठाल्या घोड चुका धर्माच्या नावावर झालेल्या आहेत. धर्म हा आपल्या पोटात आहे. तो काही बाहेर नसतो, कोणी शिकवायचा नसतो. तो आपल्या मध्ये असतो. तो अव्यवस्थित झाला म्हणजे त्याचे त्रास सुरू होतात. तो व्यवस्थित करायला सहजयोगच समर्थ आहे. तुमची जागृती झाल्या शिवाय, तुम्ही पार झाल्या शिवाय, सबंध त्याची बरोबर मांडणी होणार नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि आपण धर्म कितीतरी तऱ्हेने बिघडवत असतो, तिकडे थोडं लक्ष्य दिल पाहीजे. धर्माच्या आपल्या कल्पना म्हणजे कोण शिकवत आपल्याला धर्माबद्दल? प्रत्येक मनुष्याला धर्म समजत नाही. कोणाला वटवट करायला मिळाली, त्याने धर्माबद्दल बोलायला सुरुवात केली. लगेच आम्ही त्यांना महाराज केलं. ते बसले भीक मागायला तुमच्या जवळ. जितकी तुमची श्रद्धा असेल तितकं तुम्ही आम्हाला द्या. तर तुम्ही आपली सव्वा रुपयाची श्रद्धा त्यांना वाहिली. तिथे पांडोबा तिथे जमले त्या देवळात. मग लागल्या बायका जायला तिकडे, पुरुष जायला लागले. मग ते पांडोबांचे हळूहळू गुरु झाले. गुरु झाले, मग त्यांनी सांगितलं की बुवा बघा, तुमचा बाप या साली मेला, तुमची आई अमक्या साली मेली, वाह! यांना कसं कळाल आमची आई कधी मेली!! आमचा बाप कधी मेला!!! मग करता करता, पुढे ते सट्ट्यांचे नंबर, घोड्यांचे नंबर, अमकं टमकं सांगायला लागतात. २० जानेवारी १९७८, मुंबई अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### समृद्धी महामार्गावरील आंतरजिल्हा दरोडेखोर जेरबंद

अहिल्यानगर : समृद्धी महामार्गावर वाहने अडवून प्रवाशांना बेदम मारहाण आणि लुटमार करणाऱ्या आंतरजिल्हा दरोडेखोरांच्या टोळीचा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. अत्यंत गोपनीय आणि तांत्रिक कौशल्याच्या आधारे पोलिसांनी अवघ्या चार दिवसांत ६ आरोपींना बेड्या ठोकल्या. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेल्या दोन कारसह ९ लाख २८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या टोळीने काही वेळातच एकूण १ लाख ५० हजार ४१५ रुपयांचा ऐवज लुटला होता. एसपी सुदर्शन यांच्याकडून तपास चक्र वेगवान महामार्गावरील या गंभीर दरोड्याची दखल घेत एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. आरोपींच्या शोधासाठी एलसीबीचे विशेष पथक रवाना करण्यात आले.

# ३६ हजार ५८५ कोटींची कृषी कर्जमाफी!

## ५६ लाख शेतकऱ्यांना दिलासा; दोन लाखांच्या मर्यादेत योजनेचा लाभ

- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर
- नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यातील तब्बल ५६ लाख शेतकरी बांधवांना मोठा दिलासा देणाऱ्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने’ला मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र मंत्रिमंडळाने ५६ लाख शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी ३६,५८५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक शेतकरी कर्जमाफी योजनेला मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार असून, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. राज्य सरकारने कर्जमुक्ती, वन टाईम सेटलमेंट आणि प्रोत्साहनपर लाभ असे तीन घटक असलेली व्यापक योजना तयार केली आहे. जमीनधारणेचा कोणताही निकष न ठेवता पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार असल्याने राज्यातील बहुतांश शेतकरी या निर्णयाच्या कक्षेत येणार आहेत.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली रक्कम दोन लाख रुपयांपर्यंत असल्यास ती शासनाकडून माफ करण्यात येणार आहे. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा कमी आहे, असे शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होतील.

राष्ट्रीयकृत, खाजगी, प्रादेशिक ग्रामीण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या कर्जांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे. लाभासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅकवर नोंदणी बंधनकारक करण्यात आली असून, योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात येणार आहे.

राज्याच्या इतिहासातील सर्वात व्यापक शेतकरी कर्जमुक्ती योजनांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याबरोबरच लाखो शेतकरी कुटुंबांना दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

### अधिक कर्जदारांसाठी वन टाईम सेटलमेंट

**ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी दोन लाखांवरील रक्कम ३१ मार्च २०२७ पर्यंत भरल्यास शासन त्यांच्या खात्यात दोन लाख रुपये जमा करणार आहे. पुनर्गठित कर्जधारकांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.**



### नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन

**२०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत वेळेत पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. तसेच महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही नव्या कर्जाच्या थकबाकीवर ५० हजार रुपयांपर्यंतचा लाभ मिळू शकणार आहे.**

### हे लाभार्थी अपात्र

**राजकीय पदाधिकारी, सरकारी कर्मचारी, आयकर भरणारे नागरिक तसेच सहकारी संस्थांमधील २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारे अधिकारी व कर्मचारी या योजनेसाठी पात्र राहणार नाहीत.**

# मराठा बलिदानाला शासनाची सलामी

## मृत आंदोलकांच्या वारसांना एमआयडीसीत नोकरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** मराठा आरक्षण आंदोलनात आपल्या कुटुंबातील कर्ता सदस्य गमावलेल्या अनेक कुटुंबांसाठी राज्य सरकारचा एक निर्णय आशेचा किरण ठरला आहे. आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या वारसदारांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम आयडीसी) मध्ये नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने या कुटुंबांना आर्थिक आणि सामाजिक आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मराठा आरक्षणासाठी झालेल्या आंदोलनाने राज्यभर मोठी चर्चा निर्माण केली होती. या आंदोलनात काही कुटुंबांनी आपले जिवलग गमावले. त्यानंतर मृत आंदोलकांच्या वारसदारांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात होता. (पान ४ वर)



**या निर्णयाबाबत बोलताना मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अंतरवाली सराटी येथील आंदोलनादरम्यान दिलेल्या शब्दाची पूर्तता करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेतली जात असून भविष्यातही समाजहिताचे निर्णय घेतले जातील.**

# जलसंपदा कार्यालये आता शेतकऱ्यांच्या दारी

## उच्च न्यायालयाच्या निर्णयाने स्थलांतराला हिरवा कंदील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सिंचनाच्या कामासाठी एखाद्या शेतकऱ्याला तासन्तास प्रवास करून दूरच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागायचे. एखाद्या कालव्याची दुरुस्ती, पाणी वाटपाचा प्रश्न किंवा सिंचन योजनेची माहिती घेण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनाही अनेक जिल्ह्यांचा प्रवास करावा लागत होता. आता मात्र ही परिस्थिती बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.



गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत कार्यालयांच्या स्थलांतरासंदर्भातील जलसंपदा विभागाच्या निर्णयाला छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाने मान्यता दिल्याने हा निर्णय प्रत्यक्षात येण्याचा मार्ग अधिक मोकळा झाला आहे. त्यामुळे प्रशासन आणि लाभक्षेत्रातील नागरिक यांच्यातील अंतर कमी होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. महामंडळाने २७ मे रोजी घेतलेल्या निर्णयानुसार प्रदेश, मंडळ आणि विभाग स्तरावरील अनेक कार्यालये धरण लाभक्षेत्रांच्या जवळ हलविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या निर्णयामागील प्रमुख उद्देश म्हणजे सिंचन व्यवस्थापन अधिक गतिमान, परिणामकारक आणि लोकाभिमुख करणे हा आहे.या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने हा विषय प्रशासनाच्या धोरणात्मक निर्णयाशी संबंधित असल्याचे स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांने अखेर याचिका मागे घेतल्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेला पूर्णविराम मिळाला. दरम्यान, कार्यालय (पान ४ वर)

# महिला वाहकाला बसमध्ये मारहाण!

- विनयभंगाचा गुन्हा दाखल
- अटक न झाल्यास कामबंदचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** शेवगाव आगाराच्या एका महिला बस वाहकाला तिसगाव(ता. पाथर्डी) येथे बसमध्येच मारहाण करून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, महिला वाहकाला मारहाण होत असल्याचे पाहून संतप्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी संबंधित युवकाला बसमधून खाली उतरवून चांगलाच चोप दिला. मात्र, या गोंधळानंतर संबंधित युवक तेथून पसार झाला. या घटनेचा व्हिडिओ मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाला असून तो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.संबंधित महिला शेवगाव आगारात बस वाहक म्हणून कार्यरत आहेत. सोमवार (दि. १ जून) रोजी त्या शेवगाव ते अहिल्यानगर या मार्गावरील बसवर कर्तव्य बजावत होत्या. सायंकाळी तिसगाव बसस्थानकावर बस थांबली असताना काही प्रवासी उतरले व काही नवीन प्रवासी बसमध्ये चढले. त्यावेळी मागून वाहने येत असल्याने बसचा दरवाजा ओढताना एका प्रवाशाच्या बोटाला दरवाजा लागला. याचा राग आल्याने संबंधित प्रवासी शिवीगाळ करू लागला.महिला वाहकांनी त्यास जाब विचारला असता त्याने दमदाटी करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपीने महिला वाहकाच्या अंगाला हात लावून विनयभंग केला तसेच हाताने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या झटापटीत त्यांच्या गळ्यातील सुमारे १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र तुटून हरविल्याचेही सांगण्यात आले आहे. (पान ४ वर)

# अर्जांची छाननी आणि उमेदवारांची मनधरणी...!



करण ससाणे यांच्या गाडीतून अपक्ष उमेदवार पानसरेंचा प्रवास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत दाखल झालेल्या पाचही उमेदवारांचे अर्ज मंगळवारी (२ जून) वैध ठरले. आता ४ जून रोजी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत असल्याने कोण माघार घेणार आणि अंतिम लढत किती उमेदवारांमध्ये होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, छाननीनंतर काँग्रेसचे श्रीरामपूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष करण ससाणे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दत्तात्रय पानसरे हे दोन्ही प्रतिस्पर्धी उमेदवार जिल्हाधिकारी कार्यालयातून एकाच वाहनातून बाहेर पडले. या एकत्रित प्रवासामुळे जिल्ह्यात नव्या राजकीय चर्चांना तोंड फुटले आहे. ससाणे आणि पानसरे यांनी या निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे.

याबाबत दत्तात्रय पानसरे यांनी मिश्किल प्रतिक्रिया देताना, ४ जूनपर्यंत कोण काय म्हणेल ते म्हणू द्या, आम्ही एकत्रच प्रवास करणार. निवडणुकीत काय होईल ते पाहू, असे सांगितले. तर करण ससाणे यांनी केवळ स्मितहास्य करत वाहनाचे सारथ्य केले. त्यामुळे (पान ४ वर)

# एफआरपी थकवणाऱ्या सात साखर कारखान्यांना जप्तीची नोटीस

- केदारेश्वर कारखान्याकडे २२.४४ कोटींची थकबाकी
- राज्यात ६७७ कोटींची एफआरपी थकीत
- जिल्हाधिकाऱ्यांकडून वसुली कारवाईची तयारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या एफआरपीची रक्कम वेळेत न अदा करणाऱ्या राज्यातील सात साखर कारखान्यांवर साखर आयुक्तालयाने अवसायान (आरआरसी) कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. या कारखान्यांकडे शेतकऱ्यांचे तब्बल २३२.७९ कोटी रुपये थकीत असून त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचाही समावेश आहे. केदारेश्वर कारखान्याकडे २२.४४ कोटी रुपयांची एफआरपी थकबाकी असल्याने जिल्ह्यातील ऊस उत्पादकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

साखर आयुक्तालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार सोलापूर जिल्ह्यातील तीन कारखाने सर्वाधिक



थकबाकीदार आहेत. त्यामध्ये गोकुळ शुगर्स लिमिटेड, धोत्री या कारखान्याकडे १३०.४६ कोटी रुपये, भीमा सहकारी साखर कारखाना, टाकळी सिकंदरकडे ३०.२२ कोटी रुपये आणि श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखाना, माढा यांच्याकडे १५.९७ कोटी रुपये एफआरपी थकीत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याकडे २२.४४ कोटी रुपये, धाराशिव (पान ४ वर)

# दारूबंदी आदेश मोडणाऱ्यांना दणका

## १० जामीनदारांच्या जमिनीवर एक लाखांचा बोजा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

सोनगाव : दारूबंदी कायद्याचे उल्लंघन करून पुन्हा अवैध दारू विक्री करणाऱ्या १० आरोपींविरोधात राहुरी पोलिसांनी कठोर कारवाई करत त्यांच्या जामीनदारांच्या सातबारा उताऱ्यावर प्रत्येकी एक लाख रुपयांचा शासन बोजा चढविण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. दारूबंदीविरोधातील मोहिमेत राहुरी पोलिसांनी उचललेले हे पाऊल जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरले आहे.




राहुरी पोलीस ठाणे हद्दीत सन २०२५ मध्ये दारूबंदी कायद्यांतर्गत २२१ गुन्हे दाखल झाले होते. तर सन २०२६ मध्ये जानेवारी ते मे अखेरपर्यंत १५४ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. मागील दीड वर्षांत एकूण ३७५ गुन्हे दाखल झाल्यानंतर तीनपेक्षा अधिक गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेल्या अवैध दारू विक्रेत्यांविरोधात दारूबंदी अधिनियमाच्या कलम ९३ अन्वये १५५ प्रतिबंधात्मक प्रस्ताव श्रीरामपूर प्रांत कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते.

या प्रस्तावांपैकी १२१ प्रकरणांत संबंधित आरोपींकडून प्रत्येकी एक लाख रुपयांचे बॉण्ड घेण्यात आले होते. मात्र, बॉण्ड दिल्यानंतरही काही आरोपी पुन्हा अवैध दारू विक्री करताना आढळून आले. त्यानंतर राहुरी पोलिसांनी संबंधितांविरोधात नव्याने कारवाई करून बॉण्ड रद्द करण्याचे प्रस्ताव प्रांताधिकारी किरण पाटील यांच्याकडे सादर केले.

बॉण्डच्या अटींचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित १० आरोपींना प्रत्येकी एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. मात्र, दंडाची रक्कम न भरल्याने संबंधित आरोपींच्या जामीनदारांच्या मालकीच्या जमिनींवर शासन वसुलीचा बोजा चढविण्याचे आदेश २ जून रोजी पारित करण्यात आले.

कारवाई झालेल्या आरोपींमध्ये कैलास रामचंद्र कुसमुडे, मोहन भागवत बोरुडे (बर्डे), दिलीप अंबादास कुसमुडे, काशिनाथ अंबादास चव्हाण, दीपक मधुकर पडघलमल, नितीन साहेबराव मुंनतुडे, नवनाथ जोतिराम वाघ, जनार्दन रंगनाथ पवार, माणिक चंद्रभान पवार आणि अशोक सूर्यभान गुंजाळ यांचा समावेश आहे. राहुरी पोलिसांनी नागरिकांना (पान ४ वर)

### जामीन देताना सावध रहा

आरोपीच्या वर्तणुकीची खात्री न करता जामीनदार झाल्यास भविष्यात आर्थिक जबाबदारी स्वीकारावी लागू शकते. राहुरी पोलिसांच्या या कारवाईमुळे जामीनदार म्हणून पुढे येणाऱ्यांमध्येही जागरूकता निर्माण होणार असल्याचे मानले जात आहे.

# देहऱ्यात रिपाईच्या युवक तालुकाध्यक्षावर जीवघेणा हल्ला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**आरोपींवर कारवाई न झाल्यास आत्मदहनाचा इशारा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील देहेरे गावात दोन गटांमध्ये सुरू असलेल्या वादाकडे पाहण्यासाठी गेलेल्या एका युवकावर नऊ जणांच्या टोळक्याने कोयते आणि बेसबॉलच्या दांडक्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात रिपब्लिकन पक्षाचे युवक नगर तालुकाध्यक्ष जयराम सुरेश आंग्रे हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारार्थ नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्लेखोरांविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जखमी जयराम आंग्रे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. १ जून) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास देहेरे गावात दोन गटांमध्ये वाद सुरू होता. यावेळी चौकात बसलेल्या जयराम आंग्रे यांना मोठा गोंधळ आणि आरडाओरडा ऐकू आल्याने ते नेमके (पान ४ वर)

# बळीराजाची कर्जमुक्ती की केवळ मलमपट्टी?

महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा आणि समाजकारणाचा कणा असलेला शेतकरी आज पुन्हा एकदा कर्जमाफी आणि शासकीय धोरणांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच ३६,५८५ कोटी रुपयांची 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' मंजूर केली आणि कृषी क्षेत्रातील आर्थिक गणितांची चर्चा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किंवा राजकीय समीकरणांमुळे जाहीर होणाऱ्या या कर्जमाफ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील तात्पुरते ओझे कमी करत असल्या, तरी त्या कृषी क्षेत्रातील मूळ समस्येवर शाश्वत उपाय आहेत का, हा प्रश्न आजही अनुत्तरितच आहे. दर काही वर्षांनी द्यावी लागणारी कर्जमाफी हे प्रत्यक्षात देशाच्या आणि राज्याच्या कृषी धोरणांचे अपयश अधोरेखित करते, हे आता लपून राहिलेले नाही.




महाराष्ट्रात आणि राष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांची कर्जमाफी हा नेहमीच संवेदनशील आणि राजकीयदृष्ट्या कळीचा मुद्दा राहिला असून त्याचा एक मोठा इतिहास आहे. १९८० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. अ. र. अंतुले यांनी रिझर्व्ह बँकेचा विरोध डावलून राज्यातील शेतकऱ्यांचे १०० कोटी रुपयांचे खावटी कर्ज माफ करून देशा-तील पहिल्या ऐतिहासिक कर्जमाफीचा पाया रचला होता. त्यानंतर २००८ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर ७१,००० कोटी रुपयांची महाकर्जमाफी जाहीर केली, ज्याचा मोठा लाभ महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना झाला. पुढे २०१७-१८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून सुमारे ३५,००० कोटी रुपयांची आणि २०१९-२० मध्ये महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत २२,००० कोटी रुपयांची कर्जमाफी दिली गेली. आताच्या सरकारनेही ३६,५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर करून ५६ लाख शेतकऱ्यांना थेट फायदा पोहोचवण्याचा दावा केला आहे. हा पूर्वेतिहास पाहिला तर लक्षात येते की, सरकारे बदलली, कर्जमाफीचे आकडे बदलले, पण शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र बदललेली नाही.

या कर्जमाफी योजनांमुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांना बँकेच्या थकबाकीतून आणि कायदेशीर कारवाईतून तात्पुरती सुटका मिळते, तसेच नवीन हंगामासाठी त्याला पुन्हा नव्याने पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होतो हे नाकारता येत नाही. दुष्काळ, गारपीट आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे उद्ध्वस्त झालेल्या बळीराजाला याने घटकाभराचा दिलासा नक्कीच मिळतो. परंतु, या नाण्याची दुसरी बाजू अत्यंत चिंताजनक आहे. बँकिंग क्षेत्राच्या नियमांमुळे शासकीय स्तरावरून बँकांना निधी वर्ग होण्यास मोठा विलंब होतो आणि जाचक अटींमुळे प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत शेतकऱ्याची दमछाक होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ही कर्जमाफी केवळ बँक आणि सहकारी सोसायट्यांकडून कर्ज घेतलेल्या संस्थात्मक शेतकऱ्यांपर्यंतच मर्यादित राहते. ग्रामीण भागातील जवळपास ५० टक्क्यांहून अधिक अल्पभूधारक आणि शेतमजूर आजही सावकारी कर्जाच्या विळख्यात अडकलेले आहेत, ज्यांना या शासकीय कर्जमाफीचा कवडीचाही लाभ मिळत नाही. त्यामुळे कर्जमाफीच्या या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात गरजू घटक परिघाबाहेरच राहतो.

कृषी क्षेत्र आणि अर्थशास्त्राचे अभ्यासक कर्जमाफीच्या या राजकारणाकडे नेहमीच चिंतेने पाहतात. वारंवार दिली जाणारी कर्जमाफी ग्रामीण भागातील 'पत शिस्त' पूर्णपणे बिझवून टाकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. यामुळे प्रामाणिकपणे आणि वेळेवर कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये एक प्रकारे अन्यायाची भावना पसरते, तर दुसरीकडे पुढील निवडणुकांमध्ये पुन्हा कर्जमाफ होईल या आशेने कर्ज न फेडण्याची प्रवृत्ती वाढीस लागते, ज्याला अर्थशास्त्रात 'मॉरल हॅझार्ड' म्हटले जाते. तज्ज्ञांच्या विश्लेषणावरून स्पष्ट होते की, कर्जमाफी हा शेती संकटावरील मूळ इलाज नसून ती केवळ एक तात्पुरती मलमपट्टी आहे. सरकारने जर ३६ हजार कोटी रुपये कर्जमाफीवर खर्च करण्याऐवजी तितकाच निधी ग्रामीण पायाभूत सुविधा, सिंचन प्रकल्प, शीतगृहे आणि फूड प्रोसेसिंग युनिट्स उभारण्यासाठी वापरला असता, तर शेती कायमस्वरूपी नफ्यात आली असती. शेती नफ्यात आणल्याशिवाय शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कधीही संपणार नाही, हे उघड सत्य आहे.

वास्तविक पाहता, शेतकऱ्यांना वारंवार कर्जमाफीची भीक नको आहे, तर त्यांना हक्काचे आणि शाश्वत उत्पन्न हवे आहे. आज देशभरातील आणि महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांच्या मागण्यांकडे पाहिले तर हे सहज स्पष्ट होते. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींनुसार शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित ५० टक्के नफा धरून हमीभाव मिळावा आणि त्याला कायदेशीर संरक्षण असावे, ही शेतकऱ्यांची सर्वात प्रमुख मागणी आहे. त्यासोबतच प्रत्येक शेताला शाश्वत पाणी देण्यासाठी सिंचन व्यवस्था पूर्ण करणे, २४ तास वीज पुरवठा करणे, थेट बाजाराची सोय करून बाजार समित्यांमधील मध्यस्थांची लूट थांबवणे आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात पीक विम्याची रक्कम कंपन्यांकडून अडवली न जाता वेळेत मिळणे गरजेचे आहे. जोपर्यंत भूमिहीन आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना सुलभ व विनाअट बँक कर्ज उपलब्ध करून देऊन सावकारी पाशातून मुक्त केले जात नाही, तोपर्यंत ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळणे अशक्य आहे.

शेती क्षेत्राची सद्यस्थिती पाहता केवळ कर्जमाफीच्या घोषणा करून भागणार नाही. शासन चालवणाऱ्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, जोपर्यंत शेतीचा उत्पादन खर्च कमी होत नाही आणि उत्पादित मालाला जागतिक व देशांतर्गत बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही, तोपर्यंत कर्जबाजारीपणाचे हे दुष्टचक्र थांबणार नाही. कर्जमाफी ही केवळ राजकीय पक्षांसाठी मते मिळवण्याचे साधन बनू नये, तर ती शेतीला स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल असायला हवे. आज गरज आहे ती दीर्घकालीन आणि ठोस कृषी धोरणांची, ज्यामध्ये सिंचन क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि थेट शेतकऱ्यांच्या खात्यात सबसिडी देणे यांसारखे उपाय समाविष्ट असतील. जोपर्यंत अन्नदाता शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत नाही, तोपर्यंत प्रगत महाराष्ट्राच्या गप्पा फोल ठरतील. सरकारने आता मलमपट्टी सोडून थेट रोगाच्या मुळावर घाव घालणारे धोरण आखण्याची नितांत गरज आहे, हीच आजच्या बळीराजाची खरी अपेक्षा आहे.

## इंधन दरवाढ, कांद्याचे भाव आणि वाळू तस्करीविरोधात काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या किमती, कांद्याचे कोसळलेले बाजारभाव, नीट परीक्षेतील कथित गैरप्रकार तसेच श्रीरामपूर मतदारसंघातील वाळू तस्करीच्या प्रश्नांवर जिल्हा काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. आ. हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे आणि जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, देवळाली शहराध्यक्ष कृष्ण मुसमाडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या पाच ते सहा महिन्यांत पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. गेल्या बारा वर्षांत पेट्रोलच्या किमतीत सुमारे ३८ टक्के तर डिझेलच्या किमतीत ६३ टक्क्यांनी वाढ झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

द ु स र ी क ड े, शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. विशेषतः कांद्याचे भाव कोसळल्याने उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाने किमान २५ रुपये प्रतिकिलो दराने कांदा खरेदी करावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. देशभर गाजलेल्या नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीमुळे सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याचा मुद्दाही निवेदनातून उपस्थित करण्यात आला. तसेच श्रीरामपूर मतदारसंघातील रामपूर परिसरात वाळू तस्करांकडून मारहाणीच्या घटना घडत असल्याचा आरोप करत संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करून वाळू तस्करीला आळा घालण्याची मागणी करण्यात आली.

या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

यावेळी सभापती योगेश जाधव, नगरसेवक कलीम कुरेशी, बिट्टूशेठ कक्कड, गटनेते दासू पटारे, निलेश नागले, रणजीत पाटील, सागर भागवत, रज्जाक पठाण, भोला दुगल, नजीर शेख, आबासाहेब कड्डू, अशोक जगधने, संजय गोसावी, सुनील साबळे, प्रवीण कोठावळे, वैभव गिरमे, अमजद पठाण, अमोल नाईक, गणेश गायधने, रामचंद्र काळे, अनिल चव्हाण, रवी गायकवाड, शरद वाळुंज, योगेश उंडे, हेमंत गायधने, महेश काळे, आबासाहेब माळी, सनी मंडलिक, वैभव कुऱ्हे, प्रशांत आल्हाट, राजेश जोंधळे, सागर दुपाटी आदी उपस्थित होते.



## तालुक्यासाठी थेट बससेवा नसल्यामुळे पुणतांबेकर त्रस्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** राहाता तालुक्यात ग्रामीण भागात सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या पुणतांबा गावातील ग्रामस्थांना राहाता या तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी थेट बससेवा नसल्यामुळे येथील ग्रामस्थ माहिला विधार्थी त्रस्त झाले आहेत. पुणतांबा गावाची लोकसंख्या २० हजाराच्या पुढे आहे. गावातील जेष्ठ नागरिक महिला विद्यार्थी तसेच ग्रामस्थ यांना विविध कामासाठी तहसील कचेरीला ये जा करावी लागते. मात्र पुणतांबा येथून थेट जळगाव गणेशनगर फाटा किंवा पुणतांबा -शिर्डी -राहाता अशी बससेवा नसल्यामुळे ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. राहाता तालुक्याची निर्मिती १९९९मध्ये झाली आहे गेल्या २७ वर्षापासून पुणतांबेकर बससेवेची मागणी करत आहेत मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे. विशेष म्हणजे पुणतांबा रेल्वे जंक्शन असूनही बहुतांशी रेल्वे गाडयांना पुणतांबा येथे थांबा नाही त्यात राहात्यासाठी थेट बससेवा नाही त्यामुळे ग्रामस्थ हतबल झाले आहे. पुणतांबा गाव राहाता तालुक्यात असले तरी विधानसभेसाठी कोपरगाव मतदारसंघात आहे त्यामुळे ग्रामस्थांची अवस्था ना घरका ना घाट का अशी झालेली आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई रस त्यांची दयनीय अवस्था रोजगाराअभाव यामुळे अनेक ग्रामस्थ स्थलांतर करत आहेत. गावासाठी एक खासदार एक कॅबिनेट मंत्री व दोन आमदार असे लोकप्रतिनिधी असतांना साधी बससेवा सुरु केली जात नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

येथील जेष्ठ नागरिकांचे एक शिष्टमंडळलवकरच खा भाऊसाहेब वाकचौरे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, आ. आशुतोष काळे तसेच आ. विवेक कोल्हे यांना प्रत्यक्ष भेटून ह्या प्रश्नबाबद साकडे घालणार आहे.

## शिवीगाळ व मारहाण प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** सुनेला घेण्यासाठी माहेरचे लोकं आले असता वाद झाला आणि आरोपींनी संगीता गायकवाड यांना शिवीगाळ करुन विट व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालुक्यातील महाडूक सेंटर येथे दि. ३० मे रोजी घडली आहे.

संगिता राजेंद्र गायकवाड, वय ४५ वर्षे, रा. महाडुक सेंटर, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. ३० मे २०२६ रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास संगीता गायकवाड ह्या त्यांच्या घरी होत्या.

तेव्हा संगीता गायकवाड यांच्या सुनेच्या माहेरचे लोकं तेथे आले. तेव्हा संगीता गायकवाड त्यांना म्हणाल्या की, तुम्ही कशासाठी आले आहात असे विचारले असता ते म्हणाले की, आमच्या मुलींला घेण्यासाठी आलो आहोत. तेव्हा संगीता गायकवाड त्यांना म्हणाल्या ती आलेली चार दिवस झाले नाही, तर तुम्ही तीला घेण्यासाठी आले, असे किती दिवस चालणार.तेव्हा आरोपी संगीता गायकवाड यांच्या नात सियाला घेवुन जात असताना त्यांनी नात सियाला घेवुन जावु नका, असे म्हणुन त्याच्या हातातुन तिला घेत असताना आरोपींनी त्यांना शिवीगाळ करुन विटा व लाथाने मारहाण केली. तसेच त्यांच्या गळ्यातील पोत तोडुन तिचे नुकसान केले. आणि परत आमच्या नादी लागले तर तुम्हाला जिवेच मारुन टाकीन, अशी धमकी दिली.

संगिता राजेंद्र गायकवाड यांच्या फिर्यादीवरून आरोपी मंगल रमेश आल्हाट, रमेश मधुकर आल्हाट, संदेश रमेश आल्हाट, सर्व रा. घोडेगाव, ता. नेवासा, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## मांजरीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील मांजरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली. अहिल्यादेवी स्मारकापासून निघालेली मिरवणूक येथील ग्रामदैवत श्री चंद्रगिरी महाराज मंदिर येथे सांगता झाली यावेळ डिजे आणि विविध वाद्यांचा सुरात ही मिरवणूक काढण्यात आली. यावेळी या मिरवणुकीचे घराघरातील सुवासिनींनी घरासमोर सडा रांगोळी काढून स्वागत केले. या मिरवणुकीत गावातील घराघरातील महिला, मुली तरुण, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात अहिल्यादेवीच्या पुतळ्यास पुष्पहार घालून त्यांच्या आरतीने पूजन करण्यात आले यामध्ये काही प्रमुख कार्यकर्त्यांनी अहिल्यादेवींच्या कर्तुत्वावर गौरव पर भाषणे करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला. त्यांच्या सामाजिक धार्मिक आणि अध्यात्मिक कार्याला आपल्या विचारातून व्यक्त करून त्यांच्या विचाराची समाजाला गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

सामाजिक आणि राजकीय सत्ताकेंद्रात त्यांनी मुघल, इंग्रज तसेच पेशवे राघोबा यांचा मुसूद्देगिरीचा किस्सा वक्त्यांनी विषद केला. त्यामुळे उपस्थित मान्यवर ग्रामस्थ यांना यावेळी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या विचारांना दाद दिली. समाजात जनजागृती आणि संघटन कसे महत्वाचे आहे याबाबत काही विचारवंतांनी यावेळी आपले विचार मांडले राजकीय गट तट बाजुला ठेऊन समाजाच्या व्यासपीठावर एकत्र आले तरच तुमचे अस्तित्व तयार होईल असे विचार यावेळी पुढे आले त्यामुळे या जयंतीला वेगळेच महत्व यावेळी निर्माण झाले. यावेळी काही विचारवंतांनी महायुती शासनाने केलेल्या अहिल्यानगर नामांतराबाबत सरकारला धन्यवाद देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महायुती सरकारचा अभिनंदनाचा ठराव यावेळी संमत करण्यात येऊन शासनाला विशेष धन्यवाद देण्यात आले.



## जीर्ण शाळा इमारत व जमीन हस्तांतरणाचा प्रश्न

### आ. रोहित पवार यांच्याकडे शिष्टमंडळाचे साकडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदाचा औपचारिक पदभार स्वीकारल्यानंतर आ. रोहित पवार यांची अहिल्यानगर येथील उत्तर विभागीय कार्यालयात श्रीरामपूर मार्केट कमिटीचे संचालक मयूर पटारे व टाकळीभान येथील ग्रामस्थ शिष्टमंडळाच्या वतीने त्यांची भेट घेऊन त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले. यावेळी टाकळीभान येथील रयत शिक्षण संस्थेच्या 'न्यू इंग्लिश स्कूल व अण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालय'च्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत त्यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.



टाकळीभान हे शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे केंद्र असून गावातील अनेक विद्यार्थी या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत आहेत. मात्र, शाळेची सध्याची इमारत अत्यंत जुनी व जीर्णावस्थेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा श्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यात गळती, वर्गखोल्यांची झालेली दुरवस्था तसेच मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे शाळेसाठी नवीन व सुसज्ज इमारत उभारण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

तसेच, शाळा ज्या गट क्रमांक २५० मधील जागेवर कार्यरत आहे, त्या जागेची मालकी अद्याप शाळेच्या नावावर झालेली नाही. अनेक वर्षांपासून शाळा त्या जागेवर अस्तित्वात असली तरी सातबारा उताऱ्यावर शाळेचे नाव नोंदले गेलेले नाही. त्यामुळे भविष्यात शाळेच्या विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता असून शाळेच्या हितासाठी संबंधित जमीन शाळेच्या नावावर करून सातबारा उताऱ्यावर रयत शिक्षण संस्थेची नोंद करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी आ. रोहित पवार यांना शाळेची सद्यस्थिती, विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच संस्थेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. शैक्षणिक प्रश्नांबाबत आपण सकारात्मक भूमिका घेऊन संबंधित विषय मार्गी लावण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करू, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

या प्रसंगी बाजार समितीचे संचालक मयूर पटारे, पत्रकार रामेश्वर आरगडे, युवा नेते रणजीत मगर, सुरेश गायकवाड, सुरेश पटारे तसेच शाळेचे प्राचार्य राजेंद्र शिंदे उपस्थित होते. सर्वांनी एकत्रितपणे शाळेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रश्नांची मांडणी करून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती आ. रोहित पवार यांच्याकडे केली.

## एकल महिला स्वतंत्र धोरण समिती स्थापन करण्याचा सरकारचा धाडसी निर्णय : बाबासाहेब वाघ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** एकल महिलांच्या प्रश्नावर धोरण ठरवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मसुदा समिती नेमली आहे एकल महिलाना सक्षम करण्यासाठी स्वतंत्र धोरण ठरवणारे महाराष्ट्र राज्य देशातील पहिले राज्य असणार आहे एकल महिलांच्या क्षेत्रातील काम करणारा कार्यकर्ता म्हणून शासनाच्या या निर्णयाचा मी खूप खूप समाधानी आहे त्याबद्दल सरकारचे मनापासून अभिनंदन या मसुदा समितीमध्ये सौ एकल महिला समिती राज्य निमंत्रण कुलकर्णी यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे त्यांच्यामुळे निर्भय सर्वांगीण विकास संस्था सारख्या गाव पातळीवर काम करणाऱ्या संस्था व्यक्ती यांना धोरणात्मक सूचना धोरणात्मक सूचना करता येतील राज्य सरकारने महिला धोरण जाहीर केले तरीसुद्धा या एकल महिलांची मोठी संख्या बघता स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती सण २०११ स*** महाराष्ट्रात एकल महिलांची संख्या ५४ लाख होती ती पंधरा वर्षानंतर किमान ७० लाख असेल असा अंदाज आहे त्यामुळे या महिलांचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक असे सर्व प्रश्न बघता धोरणाची गरज होतीच ती गरज माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी त्यांच्या बजेटच्या भाषणात एकल महिलांसाठी लवकरच धोरण जाहीर करण्यात येईल अशी घोषणा केली होती त्या घोषणेच्या अंमलबजावणीची विनंती केल्यावर मुख्यमंत्री यांचे संवेदनशील प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी एकल महिला प्रश्नावर दोन बैठका घेतल्या व मसुदा समिती स्थापन करण्याची महिला बालकल्याण ण विभागाला सुचित केले महिला बालकल्याण मंत्री अदिती तटकरे व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर या यांच्या पुढाकाराने एकल महिला धोरण विषयावर चर्चा करण्यासाठी बैठक घेऊन समिती स्थापन केली या समितीचे अध्यक्ष महिला बालकल्याण आयुक्त असून राज्यातील सर्व विभागाचे अधिकारी या समितीत आहेत राज्यात पूर्वी या विषयावर ज्यांनी काम केले किंवा करत आहेत त्यांच्या सूचनाही महत्त्वाच्या ठरतील त्या सर्वांशी आदरपूर्वक संपर्क करून त्यांच्या सूचना समजून घेतल्या जातील एकल महिलांच्या अपेक्षा आणि भावना यांचे प्रतिबिंब नक्कीच या महिला धोरणात असेल अशी आम्हाला सामाजिक कार्यकर्ते म्हणून आशा आहे सरकारच्या क्रांतिकार्य निर्णयाचे आम्ही स्वागत करत आहोत.बाबासाहेब वाघ ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अध्यक्ष निर्भय सर्वांगीण विकास संस्था तथा मराठवाडा विधवा कुप्रथा निर्मूलन समिती



## माजी आ. मुरकुटे, अब्दुल शेख यांच्या शिष्टमंडळाने घेतली सुनेत्राताईंची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** नेवासा विधानसभा मतदार संघातील विविध लोकहिताचे प्रश्न, विकासकामे तसेच पक्ष संघटनेच्या बळकटीकरणाच्या संदर्भात मंगळवारीदि.२ जून रोजी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांची नेवासा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे पाटील, युवा नेते अब्दुलभैय्या शेख,माजी जिल्हा परिषद सदस्या आशाताई बाळासाहेब मुरकुटे युवा नेते विष्णू मुरकुटे यांनी भेट घेऊन चर्चा केली.लोकहिताचे कार्य करण्यासाठी पुढाकार घ्या,पक्ष आपल्या पाठीशी ठामपणे उभा राहील अशी ग्वाही सुनेत्राताई पवार यांनी यावेळी बोलतांना दिली सदर शिष्टमंडळाने नेवासा मतदार संघातील विविध विकासकामे, जनहिताचे प्रश्न आणि पक्ष संघटनेच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर आढावा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासमोर मांडला.यावेळी मार्गदर्शन करताना सुनेत्राताई पवार म्हणाल्या की ''पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तळागाळातील जनतेशी सातत्याने संपर्क ठेवावा. लोकहिताची कामे प्राधान्याने हाती घेऊन विकासाचा वेग वाढवावा. जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पुढाकार घ्या, पक्ष आपल्या पाठीशी ठामपणे उभा आहे.'' नेवासा मतदार संघातील प्रलंबित विकास कामे मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या सर्व स्तरांवर सहकार्य केले जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.या भेटीदरम्यान नेवासा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली असून आगामी काळात जनतेच्या हितासाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.



## फुले कृषि विद्यापीठात आंबा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत फळ प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षणे घेण्यात येतात. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय निर्माण करून उद्योजक होणाऱ्या लोकांच्या यशोगाथा तयार करायला हव्यात. आपला देश शेतीप्रधान देश आहे. आपला महाराष्ट्र उद्यानविद्येमध्ये अग्रेसर असून आपली शेती शाश्वत करण्यासाठी शेतीला फळप्रक्रियेची जोड देणे आवश्यक आहे. या दृष्टीने शेती शाश्वत करण्यासाठी आंबा फळपीक महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.




महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागांतर्गत पाच दिवसीय आंबा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. विलास खर्चे बोलत होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम कड व प्रक्रिया अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे आपल्या मार्गदर्शनामध्ये म्हणाले की सध्या प्रक्रिया उद्योगाला मोठे महत्त्व आले आहे. भविष्यात उद्योजक बनण्यासाठी सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी या प्रशिक्षणामध्ये शिकवण्यात येणाऱ्या सर्व विषयांचे ज्ञान आत्मसात करा. भविष्यात आंबा पिकामध्ये चांगले उद्योजक निर्माण होतील असे यावेळी ते म्हणाले. डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले, फळ प्रक्रिया प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असून सध्याच्या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना फळ प्रक्रिया उद्योग एक उत्तम शेतीपुरक व्यवसाय ठरू शकतो. हे ५ दिवसीय प्रशिक्षण निश्चितच शेतीपूरक व्यवसायासाठी महत्त्वाचे ठरेल असे यावेळी ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विक्रम कड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल घुगे यांनी तर आभार गोरक्षनाथ चौधरी यांनी मानले. यावेळी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, अधिकारी व प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आलेले २२ पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

## 'पटेल हायस्कूल'चा आदित्य बनला खाकीचा शिलेदार



**श्रीरामपूर** : अपयशाच्या वादळातही जिद्दीची ज्योत तेवत ठेवली, तर यशाचा सूर्योदय नक्की होतो. याचं सुवर्ण उदाहरण ठरला प्रेमजी रतनसी पटेल हायस्कूलचा माजी विद्यार्थी आदित्य बंडू चव्हाण. अथक परिश्रम, चिकाटी आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर त्याने अकोला जिल्हा पोलीस दलात स्थान पटकावत खाकी वर्दीचा मान मिळवला आहे. २०१८ साली पटेल हायस्कूलमधून दहावी पास झाल्यानंतर आदित्यने पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. थत्ते ग्राउंडवर घाम गाळत, लॉकडाऊन काळात वडिलांना हातभार लावताना मेडिकल एजन्सीत नोकरी करत त्याने अभ्यासाची कास सोडली नाही. आई-वडिलांच्या पाठिंब्यावर अहिल्यानगरला तीन वर्षे कठोर सराव केला. अनेक पोलीस भरतींमध्ये आले, पण अपयश हीच यशाची पहिली पायरी मानत तो लढत राहिला. अखेर अकोला जिल्हा पोलीस दलात निवड होताच त्याच्या जिद्दीला सुवर्णझळाळी लाभली. आदित्यची ही भरारी केवळ त्याच्या कुटुंबाचीच नव्हे, तर पटेल हायस्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी ठरली आहे.

## शालिनीताई विखे यांचे कश्यपी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांचे सांत्वन



**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील पिंपरणे येथील रहिवासी असलेले सचिन ठोंबरे,त्यांची पत्नी रोहिणी ठोंबरे,तसेच त्यांच्या शेजारी राहणारे केतन व कौशल पवार या चौघांचा नाशिक जिल्ह्यातील कश्यपी धरणात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली. जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सौशालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील यांनी पिंपरणे येथे जाऊन ठोंबरे कुटुंब यांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. ही घटना हृदय हेलावून टाकणारी असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. पिंपरणे येथे शालिनीताई विखे यांनी मयत सचिन ठोंबरे यांची आई श्रीमती ताराबाई ठोंबरे,भाऊ योगेश कैलास ठोंबरे,यांच्यासह संपूर्ण कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले यावेळी महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. शालिनीताई विखे यांनी या कुटुंबीयांना जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी शासकीय यंत्रणेला सूचना करण्यात आल्या आहेत.

# कोल्हेवाडीत आदिवासींच्या जागेवर ग्रामपंचायतीचा बेकायदेशीर ताबा?

## एकलव्य संघटनेचा संगमनेर पंचायत समितीवर धडक मोर्चाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील कोल्हेवाडी (वाकन) येथील आदिवासी हिंदू भिल्ल समाजाच्या खासगी मालकीच्या जागेवर ग्रामपंचायत प्रशासनाकडून बेकायदेशीररीत्या ताबा मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप 'एकलव्य संघटने'ने केला आहे. या प्रकरणी दोषींवर तातडीने कारवाई करावी, अन्यथा १० जून रोजी पंचायत समितीवर भव्य निषेध मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. या संदर्भात एकलव्य संघटनेच्या वतीने संगमनेरचे तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हेवाडी (वाकन) येथील गट नं. ३३२/४ मध्ये हिंदू भिल्ल समाजाची ०.८० आर इतकी खासगी जमीन आहे.

या जमिनीवर रघुनाथ नारायण खैरे यांच्यासह त्यांचे सख्खे भाऊ तुकाराम, सिताराम, जगन्नाथ आणि सुखदेव खैरे यांची नावे असून, हे सर्व कुटुंब त्या ठिकाणी अनेक वर्षांपासून राहतात. या जागेवर त्यांची कौलारू घरे असून ते अत्यंत गरिबीत जीवन जगत आहेत. संबंधित कुटुंबे आदिवासी व गरीब असल्याचा गैरफायदा घेऊन कोल्हेवाडी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच आणि इतर पदाधिकारी या जागेवर बेकायदेशीर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. विकासकामे



करायची आहेत असे कारण सांगून या कुटुंबांना तिथून हटवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

वास्तविक, या जमिनीचे कायदेशीर बक्षीस पत्र असताना मालकाशिवाय इतर कोणीही त्यावर ताबा घेऊ शकत नाही, असे असतानाही ग्रामपंचायत प्रशासनाकडून दमदाटी व धमकावण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप पीडित कुटुंबांनी केला आहे. एकलव्य संघटनेने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, या आदिवासी कुटुंबांना आजवर शासनाच्या कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यांना मदत करण्याऐवजी त्यांची हक्काची जमीन हडपण्याचा घाट घातला जात असल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे.

प्रशासकीय भीतीपोटी हे सर्व कुटुंब सध्या दहशतीखाली वावरत आहेत. एकलव्य संघटनेचे संगमनेर तालुकाध्यक्ष अनिल बर्डे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई झाली नाही आणि ही जमीन अधिग्रहित करण्याचे प्रयत्न थांबवले नाहीत, तर संपूर्ण संगमनेर तालुक्यातील आदिवासी समाज एकत्र येऊन १० जून रोजी पंचायत समितीवर मोठा निषेध मोर्चा काढेल.

त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीला प्रशासन जबाबदार राहील. निवेदन देतेवेळी एकलव्य संघटनेचे पदाधिकारी, बाधित कुटुंबातील सदस्य संगिता खैरे , मंगेश खैरे, सुशिला खैरे, लहाणूबाई माळी, सविता सोनवणे, अंबादास भवर, हिरामण बर्डे व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता या गंभीर आरोपांवर तहसीलदार आणि गट विकास अधिकारी काय कारवाई करतात आणि आदिवासी कुटुंबांना न्याय मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राजुरी येथे प्रवरेच्या कृषीदूतांचे आगमन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील राजुरी येथे कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय ,लोणी येथील कृषीदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीदूतांचे स्वागत केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने व संस्थेच्या मुख्य कार्यकारी आधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील आणि कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष वर्पे, डॉ. सत्येन खर्डे, डॉ. आशिष क्षिरसागर आणि प्रा. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदूत येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्रामपंचायत यावेळी राजुरी चे सरपंच संगीता पठारे उपसरपंच सोमनाथ गोरे आणि प्रयोगशील शेतकऱ्यांनी यांनी कृषिदुतांचे स्वागत केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शहरातील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रोडवर असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित महोत्सव व प्रतिमा प्रतिष्ठापना वर्धापन दिन सोहळा अशा विविध उपक्रमांनी भक्तिमय वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. मानवी मर्यादा पाळून देवत्व प्राप्त होण्याइतकं पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य मोठे होते. आपले साम्राज्य उभे करताना छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून.प्रजेचे हित त्यांनी जपले होते असे प्रतिपादन व्याख्याते प्रा.शाळीग्राम होडगर यांनी यावेळी झालेल्या कार्यक्रमात



बोलतांना केले.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे महंत वेदांताचार्य हभप श्री देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात,सचिन महाराज पवार,प्रमुख अतिथी व्याख्याते प्रा. शाळीग्राम होडगर, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य या विषयावर प्रा. शाळीग्राम होडगर यांचे व्याख्यान झाले. प्रा. होडगर म्हणाले की आपले साम्राज्य उभे करताना छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून अहिल्यादेवींनी प्रजेचे हित जपले.आपल्या राज्याच्या सीमा ओलांडुन त्यांनी मुस्लिम आक्रमणात उद्ध्वस्त झालेल्या देवालयांचा जीर्णोद्धार केला. जागोजागी पाणवठे निर्माण करुन यात्रेकरुंची, स्थानिकांची पाण्याची गरज पूर्ण केली. लोकोत्तर कार्य केल्यानेच अवघ्या समाजाकडुन अहिल्यादेवी या पुण्यश्लोक झाल्या. तीनशे वर्षांपूर्वी महिलांचे सैनिकी शिक्षण पूर्ण करून महिलांची सैन्याची तुकडी उभारणाऱ्या त्या दृष्ट्या साम्राज्ञी होत्या.

देविदास महाराज म्हस्के शास्त्री म्हणाले, अहिल्यादेवींचे कार्य शब्दात मांडता येणार नाही, त्यांचे ऐश्वर्य पाहिचे असेल तर आपल्याला नर्मदेच्या काठावर जावे लागेल, महेश्वर हे त्यांचे स्थान पाहण्यासारखे आहे. अनेक मंदिरांचा अनेक राजे महाराजांनी जीर्णोद्धार केलेला आढळतो. मात्र अहिल्यादेवींनी जेवढी मंदिरे निर्माण केली तेवढी मंदिरे एकाही राजाने केली नसतील.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी जयंती समितीचे बाळासाहेब बुचुडे, अरुण नजन, आबासाहेब तोगे, भिकाजी खोसे, रविंद्र वैद्य, राजेंद्र काळे, जालिंदर गवळी, साहेबराव दाणे, बाळासाहेब दाणे,श्रीमंत कान्हू अण्णा दाणे,अण्णासाहेब बुचुडे, लक्ष्मण दाणे, लक्ष्मण मिसाळ, मुक्ताजी मतकर, बाळसाहेब मतकर, बाळासाहेब खोसे, सुनील राहिंज, भाऊसाहेब मतकर, बाळासाहेब नगरे, चांगदेव मैदाड, बापूसाहेब तळपे, बाबासाहेब गवळी, संजय गवळी, संदीप वीर यांनी कार्यक्रम नियोजन केले.

# तिसऱ्यादिवशीही कारेगावला वादळाचा तडाखा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यात रविवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने उक्कलगाव, बेलापूर खुर्द, पढेगाव, मातापूर आदी गावात अक्षरशः दाणादाण उडवली. सोमवारी तिसऱ्यादिवशी रात्री पुन्हा वादळाने जोरदार तडाखा दिला.तर,अनेक ठिकाणी ताशी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे मोठमोठी झाडे उन्मळून पडली. घरांची छपरे उडाली, पत्रे, दूरवर फेकली गेली होती, सोलर पॅनलचे नुकसान झाले. तसेच फळबागांचेही मोठे नुकसान झाल्याने शेतकरी व नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसला आहेत.

श्रीरामपूर तालुक्यातील मातापूर, पढेगाव व कारेगाव परिसरात वादळी वाऱ्याचा सर्वाधिक फटका बसला असून याठिकाणी अनेक झाडे रस्त्यांवर कोसळल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. मातापूर-अशोकनगर मार्गावर झाडे पडल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. स्थानिक ग्रामस्थांनी व प्रशासनाने तात्काळ हालचाली करून रस्ता मोकळा केला.वादळामुळे विद्युत वाहक तारांवर झाडांच्या फांद्या पडून अनेक ठिकाणी वीजवाहिन्या तुटल्या.पढेगाव परिसरातील शेतकरी आबासाहेब धोंडीराम उंडे यांच्या घरावर मोठे लिंबाचे झाड कोसळल्याने घराचे मोठे नुकसान झाले.

ईश्वर पवार यांच्या घराचे छप्पर उडून गेले, तर लीलावती रामभाऊ गाडेकर यांचे नुकसान झाले.कारेगाव परिसरात अनेक शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान केळीची बागही भुईसपाट झाल्या आहेत.घराची भिंत कोसळल्याने त्यांचेही मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या फळबागा, भाजीपाला पिके तसेच सोलर प्रकल्पांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक पाहणीत समोर आले आहे. दरम्यान, कारेगाव परिसरातही वादळी पावसाने मोठा तडाखा दिला. शेती, घरे, कांदा चाळी, सोलर पॅनल, फळबागा तसेच विविध शेड्सचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

अनेक घरांवरील पत्रे उडून गेली असून जालिंदर होले, शुभम वाघ, सुनील गोरे, बबन पटारे यांच्यासह अनेक नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे.या घटनेची माहिती मिळताच पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पटारे यांनी तातडीने राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी संपर्क साधून नुकसानीची माहिती दिली. पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार संबंधित यंत्रणांना त्वरित पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# सोयाबीन पेरणीपूर्वी उगवण चाचणी करा : शैलेश देशमुख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : खरीप हंगामातील प्रमुख नगदी पीक असलेल्या सोयाबीनची पेरणी करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी बियाण्याची उगवण क्षमता तपासणे अत्यंत आवश्यक आहे. उगवण चाचणी केल्यामुळे बियाण्याची गुणवत्ता समजते आणि अपेक्षित रोपसंख्या मिळण्यास मदत होते, असा सल्ला पायरेन्स संचलित बाभळेश्वरच्या कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी दिला आहे. जिल्ह्यामध्ये दरवर्षी सोयाबीनचे प्रमाण हे जास्त असते.

पालकमंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, पायरेन्सच्या संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम आणि पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र मार्फत शेतकऱ्यांना खरीप हंगामाची माहिती दिली जाते याच अंतर्गत सोयाबीन पिकाच्या भरघोस उत्पादनासाठी दर्जेदार बियाण्याची निवड ही पहिली आणि महत्त्वाची पायरी आहे. अनेक शेतकरी मागील वर्षीचे घरगुती बियाणे किंवा बाजारातून खरेदी केलेले बियाणे थेट पेरणीसाठी वापरतात.

मात्र, बियाण्याची उगवण क्षमता कमी असल्यास पेरणीनंतर अपेक्षित रोपसंख्या मिळत नाही. त्यामुळे दुबार पेरणीचा खर्च वाढतो आणि उत्पादनावरही विपरीत परिणाम होतो. १०० पैकी जितके बियाणे उगवून आले तितकी टक्के बियाण्याचे उगवण क्षमता ७० टक्के पेक्षा कमी उगवण असल्यास प्रत्येकी एक टक्का कमी उगवण क्षमतेसाठी एकरी अर्धा किलो बियाणे वाढविणे ६०% पेक्षा कमी उगवण असलेली बियाणे पेरणीसाठी वापरू नये देशमुख यांनी सांगितले की, पेरणीपूर्वी बियाण्यावर शिफारशीनुसार बुरशीनाशक व जैविक बीजप्रक्रिया करावी. त्यामुळे उगवण चांगली होते तसेच सुरुवातीच्या अवस्थेतील रोगांपासून संरक्षण मिळते. पावसाची खात्री झाल्यानंतरच योग्य ओलाव्यात पेरणी करावी, जेणेकरून रोपांची वाढ जोमदार होईल.

कृषी विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी उगवण चाचणी, बीजप्रक्रिया आणि शिफारशीत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले असून, यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन सोयाबीनचे उत्पादन आणि उत्पन्न वाढण्यास मदत होणार असल्याचे नमूद केले आहे.

# सात्रळ येथे प्रवरेच्या कृषीकन्यांचे आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : राहुरी तालुक्यातील सात्रळ येथे कृषी महाविद्यालय ,लोणी येथील कृषीकन्यांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीकन्यांचे स्वागत केले. कृषीकन्या रोहिणी नवले, प्रेरणा भोस, तन्वी नांगरे, समिक्षा शिंदे, युक्ता पाटील, विद्या भांगरे या सात्रळ येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.




याप्रसंगी ग्रामपंचायत सात्रळ गाव सरपंच सतिश ताठे, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब पटेल, ग्रामपंचायत कर्मचारी अनिल भगत, ज्ञानदेच डुकरे, संजय पलघडमळ , ग्रामस्थ किशोर कडू, विलास शिंदे, विठ्ठल अनाप व इतर ग्रामस्थ यांनी स्वागत केले.

# गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर छापा

## ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त । पाच जणांविरुद्ध गुन्हा, दोघे फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखा आणि राहुरी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत देवळाली प्रवरा परिसरात सुरू असलेल्या गावठी हातभट्टी दारू निर्मितीच्या अड्ड्यावर रविवारी पहाटे छापा टाकला. या कारवाईत ५७ हजार ८६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी दोन आरोपी फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देवळाली प्रवरा गावच्या शिवारातील फत्तेराज महाराज मंदिराजवळील एका घराच्या आडोशाला गावठी हातभट्टीची दारू तयार करून विक्रीसाठी साठवून ठेवण्यात येत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती.

त्यानुसार रविवारी सकाळी ६.०४ ते ७.३५ वाजेदरम्यान छापा टाकण्यात आला. या कारवाईत गणेश रमेश गायकवाड (वय २७), राजेंद्र धोंडीराम उंडे (वय ५४) (दोघे रा. देवळाली प्रवरा) आणि रामचंद्र विठ्ठल काळे (वय ६२, रा. राहुरी फॅक्टरी) यांच्यावर कारवाई करण्यात आली. तर रविंद्र दिगंबर डुकरे आणि बापू भास्कर गायकवाड हे दोघे आरोपी फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. छाप्यात १२७ लिटर तयार गावठी हातभट्टी दारू, २६५ लिटर कच्चे रसायन, दारू निर्मितीसाठी वापरला जाणारा ब्लोअर, गुळाच्या १३ गोण्या, नवसागर सदृश पदार्थ, पांढरी तुरटी, हिरडा पावडर तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ५७ हजार ८६५ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

तपासात आरोपी विविध रसायने आणि पदार्थांचे मिश्रण करून मानवी आरोग्यास अपायकारक व विषारी स्वरूपाची गावठी दारू तयार करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या दारूचे सेवन केल्यास गंभीर शारीरिक हानी होण्याची तसेच प्रसंगी मृत्यू होण्याची शक्यता असल्याची माहिती असूनही आरोपी आर्थिक फायद्यासाठी तिची विक्री करत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोलीस कॉन्स्टेबल भगवान बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३९/२०२६ अन्वये बीएनएस कलम १२३, २७५ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) व (फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव करीत असून फरार आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दिली.

# देवळाली परिसरात तीन संशयित ड्रोन सापडले

## राहुरी पोलिसांच्या तपासाला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी आकाशात दिसणाऱ्या संशयास्पद ड्रोनमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीती आणि संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर राहुरी पोलिसांना महत्त्वाचे यश मिळाले आहे. राहुरी फॅक्टरी, बेलापूर आणि सोनगाव परिसरात प्रत्येकी एक असे एकूण तीन संशयित ड्रोन आढळून आले असून ते पुढील तपासासाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस ठाणे आणि विशेष अँटी-ड्रोन पथकाने गेल्या दोन दिवसांपासून व्यापक शोध मोहीम सुरू केली होती. या मोहिमेत अत्याधुनिक अँटी-ड्रोन गन, लेझर गन तसेच इतर तांत्रिक उपकरणांच्या सहाय्याने



संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले.

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या 'मिशन अँटी ड्रोन' मोहिमेत पुणे येथील अँटी-ड्रोन पथकातील संदीप जगताप, जालिंदर साखरे, प्रमोद ढाकणे, सोहेल सय्यद, रियाज शेख तसेच पोलीस कर्मचारी सूरज गायकवाड यांनी सहभाग घेतला.

या मोहिमेदरम्यान आकाशातील ड्रोनची दिशा, उंची आणि उड्डाण मार्गाचा अभ्यास करून त्यांचा शोध घेण्यात आला. मंगळवारी सापडलेले तीनही ड्रोन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून त्यांची तांत्रिक तपासणी करण्यात येणार आहे. हे ड्रोन कोणाच्या मालकीचे आहेत, त्यांचा वापर कोणत्या उद्देशाने करण्यात आला आणि त्यामागे कोणते नेटवर्क कार्यरत आहे का, याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दिली. दरम्यान, या प्रकरणामुळे परिसरात विविध अफवा आणि तर्कवितर्कांना उधाण आले होते. मात्र पोलिसांनी नागरिकांच्या सहकार्याने आणि तांत्रिक साधनांच्या मदतीने तपासाची दिशा निश्चित केली आहे. संशयास्पद ड्रोन दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# मोठ्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष

## गरीब भाजीविक्रेत्यांवर कारवाईचा बडगा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर नगरपालिकेने शहरातील मोठ्या अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याऐवजी हातावर पोट भरणाऱ्या गोरगरीब भाजीविक्रेते, फेरीवाले आणि छोट्या व्यावसायिकांवर कारवाई केल्याचा आरोप युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख यांनी केला आहे. या कारवाईमुळे अनेक कुटुंबांचा रोजगार हिरावला गेला असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याची टीका त्यांनी केली. देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील अनेक ठिकाणी मोठ्या व्यावसायिकांनी सार्वजनिक जागांवर अतिक्रमणे केली आहेत.

दिल्ली नाका, तीनबत्ती चौक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर तसेच पुणे-नाशिक महामार्गालगत अनेक ठिकाणी नियमबाह्य बांधकामे करून अतिक्रमणे करण्यात आल्याचे सर्वश्रुत आहे. मात्र, अशा मोठ्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे धाडस न दाखविता नगरपालिका प्रशासनाने गोरगरीब भाजीविक्रेते, फेरीवाले आणि छोट्या व्यावसायिकांवर कारवाईचा बडगा उगारल्याचा आरोप त्यांनी केला. नगरपालिकेच्या या मोहिमेमुळे रोजंदारीवर व्यवसाय करणाऱ्या अनेक कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. दिवसाची कमाई करून संसार चालविणाऱ्या भाजीविक्रेत्यांचे स्टॉल, हातगाड्या आणि व्यवसाय हटविण्यात आल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कारवाई करताना प्रशासनाने मानवी दृष्टिकोन ठेवणे आवश्यक होते, असेही देशमुख यांनी नमूद केले.

अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविताना प्रशासनाने सर्वांसाठी समान निकष लागू करावेत. मोठे असो वा छोटे, कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत. केवळ गरीबांवर कारवाई करून मोठ्या अतिक्रमणधारकांना अभय देण्याचा प्रकार अन्यायकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गोरगरीब विक्रेत्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देत त्यांच्या रोजगाराचे संरक्षण करावे, तसेच शहरातील सर्व प्रकारच्या अतिक्रमणांवर निष्पक्ष आणि समान कारवाई करावी, अशी मागणी सौरभ देशमुख यांनी केली आहे.

## पान १ वरुन

### दारूबंदी आदेश मोडणाऱ्यांना दणका

आवाहन केले आहे की, कोणत्याही आरोपीस जामीन होताना तो जामिनाच्या अटींचे पालन करेल याची खात्री करूनच जामीनदार व्हावे. अन्यथा आरोपीने अटींचे उल्लंघन केल्यास शासनाची वसुली जामीनदारांच्या मालमत्तेवर होऊ शकते.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईचा पाठपुरावा पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, समाधान फडोळ, राजेंद्र जाधव, सूरज गायकवाड, राहुल यादव, गणेश मैड, सचिन कोळी आणि वृषाली कुसळकर यांनी केला.

### देहऱ्यात रिपाईच्या युवक तालुकाध्यक्षावर जीवघेणा हल्ला

काय घडत आहे हे पाहण्यासाठी घटनास्थळाच्या दिशेने गेले. त्यांच्यासोबत त्यांचे मित्र अजय रोकडे हे देखील होते.अंगणवाडीसमोर पोहोचताच एका गटातील सात ते आठ जणांचे टोळके अचानक त्यांच्या अंगावर धावून आले. सुरू असलेल्या भांडणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे सांगूनही संबंधितांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. हल्लेखोरांनी हातातील कोयते आणि बेसबॉलच्या दांडक्यांनी बेछूट मारहाण केली. या हल्ल्यात त्यांच्या पाठीवर, डोक्यावर आणि शरीराच्या विविध भागांवर गंभीर दुखापती झाल्या. कोयत्याने वार करण्यात आल्याने तसेच दांडक्यांनी मारहाण केल्याने ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.या बाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, हल्लेखोरांपैकी काही जण राजकीय कार्यकर्ते असल्याने पोलिसांवर दबाव टाकला जात आहे. या प्रकरणातील आरोपींवर तातडीने गुन्हे दाखल करून अटक करण्यात यावी, अशी मागणी जयराम आंग्रे यांनी केली आहे. जर आरोपींवर कारवाई करण्यात आली नाही, तर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### जलसंपदा कार्यालये आता शेतकऱ्यांच्या दारी

स्थलांतराची प्रक्रिया १ जूनपासून सुरू झाली असून अनेक वरिष्ठ अधिकारी नव्या ठिकाणी रुजू झाले आहेत. काही कर्मचारी संघटनांनी या निर्णयाला विरोध दर्शविला असला तरी न्यायालयाच्या निर्णयानंतर स्थलांतर प्रक्रियेला अधिक बळ मिळाले आहे.सिंचन क्षेत्रातील जाणकारांच्या मते, धरणे, कालवे आणि लाभक्षेत्राच्या जवळ प्रशासन उपलब्ध झाल्यास निर्णय प्रक्रियेला वेग येईल. पाणी व्यवस्थापनाशी संबंधित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही होऊ शकेल. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचण्यास मदत होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सिंचनाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय लाभक्षेत्रांपासून दूर असलेल्या कार्यालयांत घेतले जात होते. त्यामुळे स्थानिक अडचणी समजून घेणे आणि त्यावर त्वरित उपाययोजना करणे अवघड ठरत होते. आता प्रशासन प्रत्यक्ष क्षेत्राशी अधिक जवळीक साधणार असल्याने सिंचन व्यवस्थापनात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर जलसंपदा विभागाच्या या पुनर्रचना उपक्रमाला कायदेशीर पाठबळ मिळाले असून, सिंचन प्रशासन अधिक प्रभावी करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. शेतकरी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांमध्ये या निर्णयाबाबत समाधानाचे वातावरण असून, त्याचे परिणाम प्रत्यक्ष कामकाजात दिसून येण्याची उत्सुकता व्यक्त होत आहे.

### मराठा बलिदानाला शासनाची सलामी

अंतरवाली सराटी येथे झालेल्या आंदोलनादरम्यान या कुटुंबांना नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. आता त्या आश्वासनाची पूर्तता होत असल्याचे मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनातील प्रमुख मागण्यांपैकी मृत आंदोलकांच्या कुटुंबीयांना सरकारी व्यवस्थेत रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी महत्त्वाची होती. त्यानुसार राज्य सरकारने प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करत एमआयडीसीमध्ये वारसदारांच्या समावेशाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अनेक कुटुंबांच्या भविष्याला नवी दिशा मिळणार आहे. कुटुंबातील कमावती व्यक्ती गमावल्यानंतर निर्माण झालेली आर्थिक अनिश्चितता कमी करण्यासाठी रोजगार हा सर्वात मोठा आधार ठरणार असल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. यासाठी सामान्य प्रशासन विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना मृत आंदोलकांच्या पात्र वारसदारांची पडताळणी करून प्रमाणपत्रे देण्याचे निर्देश दिले आहेत. अचूक शहानिशा करून ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रमाणपत्रांच्या आधारे वारसदारांना नोकरीसाठी पात्र ठरविण्यात येणार आहे.यापूर्वी या वारसदारांना राज्य परिवहन महामंडळात समाविष्ट करण्याचा वचार होता. मात्र अनेक कुटुंबांनी एमआयडीसी किंवा महावितरणमध्ये नोकरी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार एमआयडीसीच्या संचालक मंडळाने हा निर्णय मंजूर केला असून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. ंदोलनाच्या काळात झालेल्या वेदनादायी घटनांची भरपाई कोणत्याही निर्णयाने होऊ शकत नसली, तरी मृत आंदोलकांच्या कुटुंबांना स्वावलंबनाची संधी देणारा हा निर्णय त्यांच्या आयुष्यात नवा आधार निर्माण करणारा ठरणार असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

### महिला वाहकाला बसमध्ये मारहाण!

दरम्यान, आरोपीसोबत असलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनीही शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. महिला वाहकांच्या मदतीसाठी आलेल्या बस चालकास देखील आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धमकावले. या घटनेच्या वेळी परिसरातील नागरिक संतप्त झाले. त्यांनी संबंधित युवकाला बसमधून खाली ओढून चोप दिला. यामुळे तिसगाव बसस्थानक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, नागरिकांच्या तावडीतून सुटका करून घेत संबंधित युवक तेथून पसार झाला. संपूर्ण प्रकार काही नागरिकांनी मोबाईलमध्ये चित्रित केला असून त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे. सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेची माहिती मिळताच एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक दत्तात्रय खेडकर, एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष अंबादास शिरसाठ, बाळासाहेब सोनटक्के, कष्टकरी जनसंघाचे सुभाष खेडकर, किरण दहिफळे, संदीप सुडके, सुनील कर्नावट आदी पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात भेट देऊन पीडित महिला वाहकाला धीर दिला. तसेच आरोपीला तातडीने अटक करण्याची मागणी पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्याकडे केली.दरम्यान, संबंधित महिला वाहकाने पोलीस प्रशासन तसेच राज्याचे परिवहन मंत्री यांच्याकडे न्यायाची मागणी केली आहे. महिला कर्मचारी म्हणून आमच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्यात यावे. सार्वजनिक वाहतूक सेवेत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांवर अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.एसटी कर्मचाऱ्यांनी आरोपीला २४ तासांच्या आत अटक न झाल्यास सर्व एस टी कर्मचाऱ्यांच्या वतीने कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

### एफआरपी थकवणाऱ्या सात साखर कारखान्यांना जप्तीची नोटीस

जिल्ह्यातील भिमाशंकर शुगर मिल्सकडे १२.२६ कोटी रुपये, नाशिकमधील एस. जे. शुगर डिस्टिलरी अँड पॉवर प्रा. लि.कडे १.९३ कोटी रुपये तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सचिन घायाळ शुगर्सकडे १९.४९ कोटी रुपये एफआरपीची थकबाकी आहे.साखर आयुक्तालयाने या सर्व कारखान्यांना आरआरसी नोटीस बजावली असून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत थकबाकी वसुलीसाठी पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे कारखान्यांच्या मालमत्तेवर जप्ती किंवा इतर महसुली कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याची थकबाकी विशेष चर्चेत आली आहे. भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांचे पुत्र विश्वराज महाडिक

# कर्ज बुडवणाऱ्या थकबाकीदारांना न्यायालयाची चपराक

## आरोपीस ३ महिने सक्तमजुरी, १५ लाखांचा दंड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : डॉ. हेडगेवार नागरी सहकारी पतसंस्थेकडून कर्ज घेऊन ते जाणीवपूर्वक बुडवणाऱ्या आणि संस्थेची फसवणूक करणाऱ्या एका थकबाकीदाराला वैजापूर न्यायालयाने जोरदार चपराक दिली आहे. चेक अनादर (उहशीींश ईीपलश) प्रकरणी माननीय न्यायालयाने आरोपीला ३ महिने सक्तमजुरी आणि १५ लाख रुपयांचा भरीव दंड ठोठावला आहे. न्यायालयाच्या या ऐतिहासिक निकालामुळे सर्वसामान्य ठेवीदारांच्या पैशांचे रक्षण करणाऱ्या पतसंस्थेच्या कडक आणि प्रामाणिक वसुली धोरणावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**

येथील रहिवासी अमोल सोपान मते यांनी डॉ. हेडगेवार नागरी सहकारी पतसंस्थेकडून कर्ज घेतले होते. या कर्जाच्या कायदेशीर परतफेडीसाठी आरोपीने पतसंस्थेला १४,६७,८९९ रुपयांचा धनादेश (चेक) दिला होता. परंतु, बँकेत हा धनादेश वटवण्यासाठी टाकला असता, खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो अनादरित (बाउन्स) झाला.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पतसंस्थेने तातडीने कठोर पाऊल उचलले. संस्थेचे कायदेशीर सल्लागार अँड. श्री. संदीप डोंगरे यांच्यामार्फत वैजापूर न्यायालयात कायदेशीर दावा दाखल करण्यात आला.

**न्यायालयाने सुनावला कडक न्याय**

सदर प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती डी. एस. पिसाळ यांच्या न्यायालयात पार पडली. सुनावणी दरम्यान पतसंस्थेचे वसुली अधिकारी शांताराम जगताप यांनी न्यायालयात ठोस साक्षी-पुरावे सादर केले. अँड. संदीप डोंगरे यांनी मांडलेला प्रभावी युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून, माननीय न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले आणि वरीलप्रमाणे सक्त कैद व दंडाची कठोर शिक्षा सुनावली.

**"ठेवीदारांचा पैसा सुरक्षित ठेवण्यास आम्ही कटीबद्ध!"**

'पतसंस्था ही सर्वसामान्य नागरिकांच्या विश्वासावर चालते. संस्थेचे कर्ज घेऊन ते थकवणे किंवा खोटे चेक देऊन फसवणूक करणे खपवून घेतले जाणार नाही. हा निकाल म्हणजे प्रामाणिकपणे कर्ज फेडणाऱ्यांचा विजय आहे आणि थकीत कर्जदारांसाठी एक कडक इशारा आहे. संस्था आपल्या वसुली प्रक्रियेत अत्यंत पारदर्शक आणि कठोर आहे.'' डॉ. हेडगेवार नागरी सहकारी पतसंस्था प्रशासन

**थकबाकीदारांना दणका:**

कर्ज बुडवण्याचा किंवा टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कायद्याची चपराक.

पतसंस्थेचे मजबूत प्रशासन: योग्य वेळी योग्य कायदेशीर पाऊल उचलून संस्थेने ठेवीदारांचा विश्वास सार्थ ठरवला.

## अधिक ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त श्री खंडेरायाला बत्ताशांच्या दागिन्यांची आकर्षक आरास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी** : अधिक मासातील अधिक ज्येष्ठ पौर्णिमेचे औचित्य साधून आज श्रीक्षेत्र जेजुरी येथे श्री खंडेरायाची विशेष पूजा व आकर्षक सजावट करण्यात आली. श्री खंडेरायाला बत्ताशांपासून तयार केलेले सुंदर व आकर्षक दागिने परिधान करण्यात आले होते. या अनोख्या अलंकारांनी भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यावेळी देवासमोर तब्बल ५१ किलो अनारसे, बत्ताशे आणि मैसूर पाक यांची भव्य आरास करण्यात आली. तसेच तांब्याच्या निरंजनामध्ये दीप प्रज्वलित करून धार्मिक वातावरण अधिक मंगलमय करण्यात आले. सदर विशेष पूजा व धार्मिक विधींचे आयोजन श्री मार्तंड देवसंस्थान यांच्या वतीने करण्यात आले. मंदिरातील पुजारी, सेवेकरी व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले. या प्रसंगी ॲड. विश्वास पानसे आणि मंगेश घोणे उपस्थित होते. अधिक मासातील या विशेष धार्मिक सोहळ्यामुळे जेजुरी गडावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली




## वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : देशात रक्ताचा प्रचंड तुटवडा पाहता येथील उपजिल्हा रुग्णालय व साई माऊली बहुउद्धेशिय सेवा भावी संस्था या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आरोग्य कर्मचारी श्याम उचित यांच्या सेवापूर्ती सोहळ्या निमित्त व योगायोगाने आलेल्या वाढदिवस निमित्तमंगळवार(ता,०२)रोजी आयोजित रक्तदान शिबिरात ४१ रक्तदात्यानी रक्तदान करून या राष्ट्रीय व सामाजिक कार्यात मोलाचे योगदान दिले.छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयतील शासकीय रक्त पेढीने रक्त संकलित केले या शिबिराचे उदघाटन उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरविंद हरबडे व जिल्हा आरोग्य समिती सदस्य व सामाजिक कार्यकर्ते




ठा.धोंडीरामसिंह राजपूत यांनी पहिले रक्तदाते गोटीराम बसवेकर यांचे गुलाब फुल देऊन स्वागत केले.रक्त संकलन बँकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अरुण मरमट,डॉ.माधुरी बिडवे,डॉ.जोहरा, रक्तदान बँकअधिकारी सुमन धुळे,सहाय्यक अनुसया ,महेंद्र काटकर ,मनोज गायकवाड, उपजिल्हा रुग्णालय मुख्य अधिपरिचारिका रुख्मिन गवई यांनी रक्त संकलन साठी सहकार्य केले.सूत्र संचलन किशोर वाघुले यांनी केले.या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे लक्ष्मीकांत दुबे,निलेश चापेकर,विजय पाटील,शशिकांत पाटील,ननवरे,मापारी,चौधरी,यांच्या सह आरोग्य कर्मचारी व साई माऊली बहुउद्धेशिय सेवा भावी संस्थेचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. (फोटो कॅप्शन-पहिले रक्तदाते गोटीराम बसवेकर,सुमन धुळे,डॉ,अरविंद हरबडे,धोंडीरामसिंह राजपूत)

# किरकोळ कारणावरून हल्ला

## तिघे जखमी सहा जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : लाडगाव रस्त्यावरील शेजारी शेजारी असणाऱ्या दोन दुकानदारांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे हल्ल्यात रूपांतर होऊन मामा भाच्यासह तिघेजण गंभीर जखमी झाले. याप्रकरणी जखमी रहीम खान अहमद खान पठाण राहणार स्वामी समर्थ नगर लाडगाव रोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सहा जणांविरुद्ध पोलिसात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

जाफर हुसेन शेख, अदनान सय्यद असलम, अतिक उर्फ अतो शेख रऊफ, फुरकान शेख खालेद, अहमद शेख जाफर व रिजवान शेख खालेद अशी या आरोपींची नावे असून हे सर्व शहरातील दर्गा बेस भागातील रहिवासी आहेत. दरम्यान या घटनेत फिर्यादी रहीम खान अहमद खान पठाण, त्यांचा भाचा परवेज अमजत खान व नईम खान या तिघांना लोखंडी रोड व काठ्यांनी मारहाण झाल्याने गंभीर जखमी झाले आहेत. यातील परवेज खान यास वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात आले आहे

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २६ मेला सायंकाळी घडली. यातील जखमी रहीम खान पठाण यांचे लाडगाव चौफुली येथे नवीन ट्रेडिंग कंपनी नावाचे टाइल्सचे दुकान आहे. या दुकानाच्या बाजूला आरोपी जाफर हुसेन शेख यांचा गाळा आहे. रहीम खान यांच्या फिर्यादीनुसार, जाफर शेख हा नेहमी छोट्या मोठ्या कारणावरून शिवीगाळ करून वाद घालत असतो. सायंकाळी सात वाजेच्या सुमानास एका हायवाचालकांनी दुकानासमोर ठेवलेल्या फरशी व कडप्पा यांना धक्का लावून रहीम खान हे हायवा चालकाला समजून सांगत असताना जाफर हुसेन शेख हा तिथे आला व त्याने हा रस्ता आहे इथे कडप्पा, फरश्या ठेवण्याची जागा नाही असते म्हणून तेथून फरश्या काढण्यास सांगितले. हायवा चालक तिथून निघून गेला. मात्र त्यानंतर जाफर हुसेन शेख व त्याच्या साथीदारांनी लोखंडी रॉड व लाठ्या काठ्यांनी दुकानातील कामगारांसह तिघांना जबर मारहाण केली असे तक्रारीत म्हंटले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास फौजदार एकनाथ नागरगोजे हे करत आहेत.

**नावात बदल**

माझे जुने नाव वेन्कटेश (VENKATESH) सुरेश अहिरे (माझे दहावीचे बोर्ड सर्टिफिकेट ,मार्कशीट शाळेचा दाखला वरील नाव) असे असून माझे नवीन नाव व्यंकटेश (VYANKATESH) सुरेश अहिरे असे खरे नाव आहे दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून इतर दुसरी कोणतीही अन्य व्यक्ती नाही.

**प्रतिज्ञापत्र**

**क्र. २६५२२४२०४१२६८१००६८१०३१**

**दिनांक २९/०५/२०२६**

**Change in Name**

"I am changing my name from 'SUWARNA BABASAHEB BHONGAL' to 'SUVARNA SUNIL PATIL' for passport issuance.

Address:

Kandgaon Road, Dukrewadi,

Malewadi/Dukrewadi,

Ahmednagar,

Maharashtra – 413711, India

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME

NAZIA BEGUM

(BIRTH CERTIFICATE)

( BEFORE NAME )

TO NEW NAME AS

NAZIYA ASHIFKHAN PATHAN

(AADHAR NO. 528579781613)

FROM VIDE AFFIDAVIT

BEFORE NOTARY PUBLIC

NEVASA

PLACE: NEVASA

DATE : 02/06/2026

**Change in name**

I HAVE CHANGE MY OLD NAME

MALTI DATTATRAYA NIKUMBH

(IN PASSPORT No.N9511972)

(BEFORE NAME)

TO THE NEW NAME AS

MALTI DATTATRAY NIKUMBH

( AADHAR No. 959209539181)

FROM VIDE AFFADAVIT BEFORE

NOTARY PUBLIC KOPARGAON

PLACE – KOPARGAON

DATE – 02/06/2026

## पान १ वरुन

### अर्जांची छाननी आणि उमेदवारांची मनधरणी...!

राजकीयदृष्ट्या वेगवेगळ्या वाटांवर असलेल्या या दोन नेत्यांचा प्रवास मात्र एकाच दिशेने असल्याचा सूचक संदेश दिला गेला का, अशी चर्चा सुरू झाली आहे. निवडणूक रिंगणामध्ये भाजपचे उमेदवार व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, काँग्रेसचे श्रीरामपूर नगराध्यक्ष करण ससाणे (अपक्ष अर्ज), अजित पवार राष्ट्रवादीचे नेते दत्तात्रय पानसरे (अपक्ष अर्ज), कमलेश हस्तीमल गांधी (शेवगाव), मच्छिंद्र पांडुरंग धुमाळ (राहुरी) यापैकी कोण उमेदवारी मागे घेणार आणि अंतिम लढतीत किती उमेदवार राहणार, हे ४ जून रोजी स्पष्ट होणार आहे. अहिल्यानगरची निवडणूक बिनविरोध होणार अशी चर्चा राज्यातील राजकीय वर्तुळात असली तरी उमेदवारी माघारीच्या शेवटच्या दिवशी कोण मैदानातून बाहेर पडणार, महाविकास आघाडी आणि महायुतीचे अंतिम राजकीय गणित काय ठरणार, तसेच निवडणूक बिनविरोध होणार की थेट लढत रंगणार, याचे उत्तर त्याच दिवशी मिळणार आहे.

## वैंजापूर नगरपालिकेच्यावतीने 'पीएम स्वनिधी' महोत्सव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

वैजापूर - पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत लाभार्थ्यापर्यत योजनेचा अधिक व्यापक लाभ पोहचवण्यासाठी दि ०१ जून २०२६ ते दि ३० जून २०२६ या कालावधीत वैजापूर नगरपालिकेच्यावतीने 'पीएम स्वनिधी महोत्सव' आयोजित करण्यात आले आहे. नगराध्यक्ष डॉ दिनेश परदेशी.उपनगराध्यक्ष शेख रियाज शेख अकिल व पालिकेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्या मार्गदर्शनाखाली वैजापूर शहरात स्वनिधी महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

**बुधवार दि . ३ जून २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१९० २८० २२६ | ०-६ | १२३ ४४८ ८८०

जोड ०१-५६-२४-७३-६९

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१८० २८९ २२५ | ९-३ | १२० १३९ ३३७

जोड ९०-४३-८६-१२-३५

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१४० २३० ७८० | ५-४ | १३० २४८ ४४६

जोड ५६-९४-२३-०८-४७

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## वादळीवाऱ्यामुळे विद्युत पोल आडवे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : वादळीवाऱ्यामुळे विद्युत पोल आडवे झाल्याने त्याची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. ३१ मे रोजी अचानक आलेल्या वादळीवाऱ्यामुळे गंगापूर तालुक्यातील घोडेगाव येथील संतोष पंडीत यांच्या गट क्रमांक ३०७ मधील शेतातील विद्युत खांब आडवे झाले असून यामुळे जमीनीत विद्यूत प्रवास उतरुन जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महावितरणने तत्काळ आडवे झालेल्या विद्यूत पोलची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकरी सतोष पंडीत यांच्याकडुन होत आहे.



## 'त्या' खोट्या गुन्ह्याची चौकशी करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर तालुक्यातील बाबुळगावगंगा शिवारात गोदावरी नदीच्या पात्रात २४ मे रोजी रात्री झालेल्या गोळीबार प्रकरणातील गुन्हा हा खोटा गुन्हा असून या गुन्ह्याची सखोल चौकशी करण्यात आली तसेच खोटा गुन्हा दाखल करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी या प्रकरणातील आरोपी व श्रीरामपूर येथील विद्यमान नगरसेवक अर्जुन खुशाल दाभाडे यांच्या पत्नी धनश्री अर्जुन दाभाडे यांनी तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाकडे केले आहे त्यामुळे या प्रकरणाला आता वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे.

धनश्री दाभाडे यांच्यासह विद्रोही पँथरचे राज चव्हाण, रिपाईचे तालुकाध्यक्ष अनिल रणनवरे, बाळासाहेब त्रिभुवन, आदींनी सोमवारी वैजापूर येथे उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांची भेट घेऊन या संदर्भात निवेदन दिले. फुंदे यांनी निवेदन स्वीकारून याबाबत तपास करण्याचे आश्वासन दिले.

बाभूळगाव गंगा येथील नदीपात्रात २४ मे रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास नगरसेवक अर्जुन दाभाडे व इतर लोकांनी त्यांच्या हातातील बंदुकीने फिर्यादी जालिंदर कुंजीर हे मोटर चालू करण्यासाठी गेले असताना ' तू पोलिसांना आमचे लोकेशन देतोस ' असे म्हणून कुंजीर यांच्या दिशेने फायरिंग केली होती अशी तक्रार झाल्यानंतर विरगाव पोलीस ठाण्यात अर्जुन दाभाडे यांच्यासह काही जणांवर आला होता. हा गुन्हा खोटा असल्याची माहिती निवेदनात दिली असून निवेदनावर धनश्री दाभाडे, प्रीती हातागळे, राज चव्हाण, अमोल औटी, अनिल रणनवरे, गौतम शेळके आदींच्या सह्या आहेत.




## वैजापूर तालुक्यात पाऊस

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्याच्या ग्रामीण भागात काही ठिकाणी वादळी वारे व विजेच्या कडकडाटसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे घरावरील पत्रे उडून जाण्याच्या घटना घडल्या. परसोडा येथे श्याम राजपूत यांच्या शेतातील पत्रे उडाले. चिंचडगाव येथे राघू पाटील बारहाते यांच्या घराजवळ नारळाच्या झाडाजवळ वीज पडल्याची घटना घडली. यात कुठलीही जीवित हानी झाली नाही. पालखेड व परिसरातही वादळी वारे सुटले होते. शहर व परिसरात रविवारी सायंकाळी पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. परिणामी नागरिकांना उकाड्यापासून तात्पुरता दिलासा मिळाला.



**शुभ लाभ**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 To 13/03/2026 | 236 | 16 | 240 | 168 | 56 | 880 | 578 | 05 | 889 | 248 | 43 | 148 | 334 | 09 | 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 | 56 | 899 | 200 | 21 | 380 | 460 | 02 | 499 | 127 | 02 | 138 | 670 | 38 | 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 | 34 | 356 | 455 | 46 | 178 | 569 | 03 | 788 | 130 | 46 | 240 | 330 | 64 | 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 | 90 | 136 | 134 | 87 | 160 | 270 | 97 | 119 | 119 | 12 | 156 | 169 | 66 | 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 | 70 | 226 | 145 | 02 | 778 | 135 | 98 | 477 | 350 | 82 | 156 | 124 | 78 | 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 | 06 | 150 | 149 | 43 | 670 | 239 | 45 | 500 | 133 | 77 | 890 | 260 | 85 | 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 | 00 | 127 | 889 | 58 | 459 | 122 | 53 | 355 | 557 | 71 | 380 | 349 | 68 | 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 | 63 | 120 | 440 | 85 | 780 | 160 | 71 | 128 | 679 | 29 | 199 | 688 | 27 | 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 | 71 | 399 | 148 | 34 | 680 | 239 | 48 | 279 | 246 | 25 | 258 | 240 | 66 | 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 | 79 | 270 | 370 | 04 | 239 | 600 | 68 | 233 | 190 | 01 | 128 | 477 | 85 | 159 |
| 18/05/2026 to 22/05/2026 | 890 | 79 | 450 | 568 | 96 | 178 | 147 | 22 | 129 | 788 | 30 | 488 | 289 | 93 | 256 |
| 25/05/2026 to 29/05/2026 | 560 | 11 | 290 | 346 | 37 | 133 | 890 | 78 | 468 | 190 | 05 | 258 | 460 | 06 | 556 |
| 01/06/2026 to 05/06/2026 | | | | | | | | | | | | | | | |

## द•ख•ल

### पशुचिकित्सा व्यवसायी संघटनेतर्फे सेवानिवृत्त पशुधन अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार



**अहिल्यानगर :** पशुचिकित्सा व्यवसायी संघटनेच्या वतीने पशुधन पर्यवेक्षक, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन विकास अधिकारी गट-ब व इतर कर्मचारी बांधवांचा सेवापूर्ती बद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे, सहाय्यक आयुक्त डॉ. मुकुंद राजळे, डॉ. संतोष पालवे, डॉ. अरुण हरिश्चंद्रे, संघटनेचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर सोनावळे , संघटनेचे सचिव डॉ. नितीन निर्मळ, डॉ. संतोष साळुंखे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन निर्मळ यांनी केले. सूत्रसंचालन सुरेश घुले यांनी तर आभार रामदास आचार्य यांनी मानले. जिल्हा संघटनेचे सोनावळे यांनी मनोगतात संघटनेचा आढावा घेतला. ते म्हणाले, या कार्यक्रमाचे नियोजन दोन वर्षांपासून ठरवले होते. संघटनेच्या माध्यमातून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्याचे भाग्य आम्हा कार्यकर्त्यांना लाभले. पशुपालकांच्या प्रोत्साहनामुळे सेवा शक्य डॉ. पाटील यांनी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या दीर्घ व उल्लेखनीय सेवा कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### बाबुर्डी घुमट शेतरस्त्यासाठी शेतकऱ्यांचा उपोषणाचा इशारा




**अहिल्यानगर :** अहिल्यानगर तालुक्यातील बाबुर्डी घुमट येथील शिंदे मळा परिसरातील शेतकऱ्यांनी शेतात ये-जा करण्यासाठी कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी करत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याअभावी शेतीची कामे करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी गोरख जाधव, कांताबाई जाधव, दिनेश निकाळजे, प्रिया निकाळजे, सुनील कांबळे, दानियल तिजोरे, संगीता तिजोरे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बाबुर्डी घुमट येथील गट क्रमांक २७९ मधील जमीन दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत ७ लाभार्थ्यांना सन २००७ मध्ये वाटप करण्यात आली होती. मात्र, जमीन मिळून जवळपास दोन दशके उलटूनही संबंधित शेतजमिनीपर्यंत जाण्यासाठी कोणताही अधिकृत रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतीची मशागत, पिकांची वाहतूक तसेच दैनंदिन शेतीकामे करताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे शेतरस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी वारंवार केली असूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने येत्या एका महिन्याच्या आत शेतकऱ्यांच्या शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध करून द्यावा, अन्यथा सर्व लाभार्थी व शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसतील, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

### जेऊरमध्ये तरुणावर कोयत्याने हल्ला

**अहिल्यानगर :** तालुक्यातील बायजाबाई जेऊर परिसरात नाचण्याच्या कार्यक्रमात धक्का लागल्यावरून झालेल्या वादात एका तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जेऊर परिसरात नाचगाण्याचा कार्यक्रम सुरू असताना सुमीत संजय कोल्हे आणि आरोपींमध्ये किरकोळ वाद झाला. नाचताना धक्का लागला, नीट नाचा, असे सुमीत यांनी आरोपींना म्हटले. या गोष्टीचा तीव्र राग आल्याने आरोपी रोहन कैलास पाटोळे याने सुमीत यांच्यावर हातातील कोयत्याने थेट वार केला. हा वार अडवण्यासाठी सुमीत यांनी डावा हात मध्ये केला असता, कोयता त्यांच्या हाताला लागून ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर अमित दिलीप पाटोळे याने सुमीत यांच्या डाव्या खांद्यावर कोयत्याने दुसरा वार केला. या हल्ल्यामुळे सुमीत खाली कोसळले. सुमीत खाली पडल्यानंतर आरोपी रोहन पाटोळे, शुभम पाटोळे, अमित पाटोळे, अक्षय पाटोळे, दाद्या पाटोळे आणि कैलास पोटोळे यांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सुमीत कोल्हे यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी सहाही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### शेतजमीन परत करण्यासाठी महिलेला धमकी

**अहिल्यानगर :** तालुक्यातील निंबळक शिवारामध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, खरेदी केलेली शेतजमीन परत देण्यासाठी एका महिलेला फोनवरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर संशयित आरोपीने पीडित महिलेच्या शेतातील खोलीत बेकायदेशीरपणे प्रवेश करून ती खोली आग लावून पेटवून दिली. या



आगीत खोलीतील महत्त्वाचे दस्तऐवज, कागदपत्रे आणि इतर साहित्य जळून खाक झाले असून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेने निंबळक शिवारातील गट क्रमांक ४८७/अ मधील शेतजमीन खरेदी केली होती. हीच जमीन पुन्हा परत मिळावी म्हणून संशयित आरोपी सचिन बबन बारस्कर (रा. आहिल्यानगर) हा ऑगस्ट २०२५ ते २६ मे २०२६ या कालावधीत पीडित महिलेला सतत फोन करून धमकावत होता. जमीन परत न केल्यास गंभीर परिणाम भोगण्याची धमकी त्याने दिली होती. यानंतर संशयिताने थेट शेतातील खोलीत घुसून जाणीवपूर्वक आग लावली. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी आणि पोलीस अंमलदार खामकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी आरोपी सचिन बारस्कर याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# वडझिरेत रोहिंग्या व बांगलादेशींची घुसखोरी

## एटीएस मार्फत चौकशी करा : आ. जगताप

## पारनेरमध्ये सकल हिंदू समाजाचा 'रास्ता रोको'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज : पारनेर तालुक्यातील वडझिरे व परिसरातील गावांमध्ये काही बांगलादेशी घुसखोर व रोहिंग्यांनी अनधिकृतपणे वास्तव्य करून स्थानिक नागरिकांना त्रास देणे आणि जमिनी हडपण्याचे प्रकार सुरू केले असल्याचा आरोप करत आ. संग्राम जगताप यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. देवी भोयरे फाटा येथे स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आयोजित करण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनामध्ये सहभागी होऊन त्यांनी प्रशासनाला सज्जड इशारा दिला.**

आ. संग्राम जगताप यांनी स्पष्टपणे मागणी केली की, या भागातील कथित घुसखोरांची केवळ स्थानिक पातळीवर चौकशी न करता ती दहशतवाद विरोधी पथकामार्फत करण्यात यावी. स्थानिक नागरिकांच्या जमिनी बळकावण्याच्या वाढत्या घटनांमुळे जनतेमध्ये असंतोष असून, प्रशासनाने यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा स्थानिक नागरिक स्वतःच या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, असा इशारा त्यांनी दिला. वडझिरे परिसरासह संपूर्ण पारनेर तालुक्यातून अशा अवैध घुसखोरांचा बीमोड करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर भविष्यात यापेक्षाही मोठे आंदोलन उभारले जाईल आणि प्रशासनाच्या परवानगीची वाट न पाहता कायदा हातात घेऊन नागरिक या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, अशा शब्दांत त्यांनी आपला पवित्रा मांडला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वडझिरे आणि परिसरात वाढत्या अवैध घुसखोरीच्या मुद्द्यावरून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घुसखोरीच्या विरोधात आणि प्रशासनाला जागे करण्यासाठी सोमवारी १ जून २०२६ रोजी आ. संग्राम जगताप व सागर बेग यांच्या नेतृत्वाखाली'सकल हिंदू समाजा'च्या वतीने पारनेर-बेल्ह-आळेफाटा रोडवरील देवीभोयरे फाटा येथे भव्य 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले.

**कायदा हातात घेण्यास भाग पाडू नका...**

जर प्रशासनाने या घुसखोरांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केली, तर भविष्यात यापेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल. इतकेच नव्हे, तर प्रशासनाच्या परवानगीची वाट न पाहता कायदा हातात घेऊन नागरिक स्वतः या घुसखोरांचा बंदोबस्त करतील, असा इशारा त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून आ. संग्राम जगताप यांनी दिला.

गेल्या काही दिवसांपासून परिसरात रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांची वाढती संख्या, तसेच बांगलादेशी जिहादी वृत्तीच्या वाढत्या घटनांमुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर



प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि प्रशासनावर दबाव निर्माण करण्यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आले होते. आंदोलनादरम्यान 'अवैध घुसखोरीच्या विरोधात सकल हिंदू समाज मैदानात' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

या आंदोलनात सकल हिंदू समाजाचे शेकडो बांधव, महिला, युवक आणि युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हिंदुत्ववादी आमदार संग्रामभैय्या जगताप आणि धर्मरक्षक सागर बेग यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या भाषणातून त्यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला की, जर तातडीने या घुसखोरांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली गेली नाही, तर हे जनआंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

आंदोलकांकडून करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये घुसखोरांचा शोध घेऊन त्यांना तातडीने बाहेर काढणे आणि परिसरातील असुरक्षिततेचे वातावरण दूर करणे, यांचा समावेश आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर देवीभोयरे फाटा परिसरात तणावपूर्ण शांतता होती. आंदोलनाच्या अनुषंगाने कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून स्थानिक प्रशासनाने परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

या आंदोलनाने प्रशासनाला आपल्या भूमिकेवर पुनर्विचार करण्यास भाग पाडले असून, स्थानिक नागरिकांमध्ये वाढत्या घुसखोरीबाबत असलेल्या भीती आणि असंतोषाची दखल आता सरकारला घ्यावीच लागणार आहे. या आंदोलनामुळे पारनेर-बेल्ह-आळेफाटा मार्गावरील वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती.

## स्व. आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** स्व. आ. शिवाजीराव कर्डिले यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनतेच्या सेवेसाठी वाहिले. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांनी सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम केले. लोकांच्या भावना समजून घेऊन त्यांच्यासाठी झटणारे लोकनेते म्हणून त्यांची



ओळख निर्माण झाली. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिर, वृक्ष वाटप आणि वृक्षसंवर्धन संदेश कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा आदर्श संदेश देण्यात आला आहे. स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी सुरू केलेल्या लोकहिताच्या कार्याचा वारसा आ. अक्षय कर्डिले यांनी अधिक जोमाने पुढे नेऊन जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. स्व. आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिर व वृक्ष वाटप तसेच वृक्षसंवर्धन संदेश कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, आ. अक्षय कर्डिले, आ. मोनिकाताई राजळे, आ. काशिनाथ दाते, मा. आ. स्नेहलता कोल्हे, बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, रावसाहेब कर्डिले, दादाभाऊ चितळकर, बाजीराव गवारे, विनायक देशमुख यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले की, स्व. शिवाजीराव कर्डिले माणसातील माणूस, जिवाभावाचा सहकारी आणि लोकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. लोकांना जोडून ठेवण्याची विलक्षण क्षमता त्यांच्यामध्ये होती. आ. अक्षय कर्डिले यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी आ. मोनिकाताई राजळे, मा. आ. स्नेहलता कोल्हे, यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रभाजी सुळ यांनी तर भाऊसाहेब बोठे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## कल्पतरू राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अहिल्यानगरचा झेंडा!

### स्वरा होशिंग, थरूनिका ढगे यांना द्वितीय पारितोषिक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सोलापूर येथे दिनांक ३० व ३१ मे रोजी कल्पतरू शास्त्रीय कला आणि सांस्कृतिक प्रतिष्ठान, तसेच नाट्यकेशी कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित कल्पतरू राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अहिल्यानगरच्या कु. स्वरा क्षितिजा संकेत होशिंग आणि कु. थरूनिका अशोक ढगे यांनी आपल्या उत्कृष्ट नृत्य सादरीकरणातून द्वितीय पारितोषिक पटकावून शहराचे नाव उज्ज्वल केले.

देशभरातील विविध राज्यांमधून सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये अत्यंत चुरशीची स्पर्धा झाली. अशा स्पर्धेत आपल्या कला, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत परीक्षकांची विशेष दाद मिळवली. त्यांच्या सादरीकरणातील ताल,



भाव, लयबद्धता आणि नृत्यावरील प्रभुत्व यामुळे उपस्थित प्रेक्षकही मंत्रमुग्ध झाले.

या यशामागे नृत्यदर्पणच्या सौ. अपर्णा थत्ते मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थिनींना सातत्याने प्रशिक्षण देत नृत्यकलेतील बारकावे शिकविले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या विद्यार्थिनींना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यश मिळवता आले, अशी भावना पालकांनी व्यक्त केली.

सोलापूर येथे आयोजित कल्पतरू फेस्टिव्हल या प्रतिष्ठित नृत्य स्पर्धेमध्ये सोनू डान्स अकॅडमीच्या विद्यार्थिनींनीही उल्लेखनीय कामगिरी केली. क्लासिकल, फोक आणि विविध नृत्यप्रकारांमध्ये सहभाग घेत त्यांनी अनेक पारितोषिकांवर आपले नाव कोरले. त्यामुळे अकॅडमीच्या यशामध्ये आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

यशस्वी विद्यार्थिनींचे औद्योगिक वसाहतीतील उद्योजक नवनाथ गोसावी, अरुण रासकर, दीपक तवर, भूपेंद्र रासने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

कु. स्वरा होशिंग या कैसर्स फाऊंडेशन स्कूलमध्ये शिक्षण घेत असून, कु. थरूनिका ढगे या आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी आहेत. शालेय शिक्षणासोबतच नृत्यकलेचा सातत्याने सराव करून त्यांनी मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.

## महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज शोरूमची ४१ लाखांची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील शिल्पा गार्डन परिसरातील महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज प्रा.लि.शोरूमची तब्बल ४१ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात शुभम संजय शिंदे (वय २७, रा. सदर बाजार, भिंगार, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पवन गुरुनाथ पांडव (रा. निर्मल नगर, सावेडी, अहिल्यानगर) आणि संतोष त्रिंबक दळवी (रा. भगवान निवास, निर्मल नगर, सावेडी, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपींनी आपसात संगणमत करून बँकेचे बनावट युटीआर क्रमांक तयार केले. हे बनावट क्रमांक त्यांनी फिर्यादी शुभम शिंदे आणि शोरूमचे मुख्य व्यवस्थापक सचिन चांदने यांच्या भ्रमणध्वनीवरील संदेश प्रणालीवर पाठवले. हे बनावट क्रमांक खरे असल्याचे भासवत आरोपींनी शोरूमची आणि प्रशासनाची दिशाभूल केली. याद्वारे शोरूमचे तब्बल ४१ लाख रुपये अडकवून फसवणूक करण्यात आली. या प्रकरणाचा प्राथमिक अर्ज चौकशीसाठी प्रलंबित होता. अखेर चौकशी पूर्ण झाल्यानंतर या प्रकरणी अधिकृत गुन्हा दाखल करण्यात आला. कोतवालीचे प्रभारी पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## नगर-पुणे महामार्गावर अपघात : तोडफोड करत गाडी पळवली

**अहिल्यानगर :** नगर ते पुणे महामार्गावर चास गावच्या शिवारात अपघात घडला. यावेळी झालेल्या वादात टोळक्याने फिर्यादीच्या नातेवाईकांना धक्काबुक्की करत वाहन बळजबरीने पळवून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात किशोर ब्राम्हणे आणि अमोल ब्राम्हणे (दोघे रा. वाडेगव्हाण, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) यांच्यासह काही अनोळखीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत किरण बाळासाहेब शेटे (रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चास गावच्या शिवारामध्ये असणाऱ्या दुर्वा हॉटेलच्या शेजारी व भारत पेट्रोल पंपाच्याजवळ फिर्यादी किरण शेटे यांच्या वाहनाला आरोपीने आपल्या वाहनाने जोराची धडक दिली. या भीषण अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर आरोपींनी आपल्या गाडीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई फिर्यादीकडे मागितली. परंतु, फिर्यादी यांनी नुकसान भरपाई देण्यास नकार दिला. याचा राग मनात धरून आरोपी किशोर ब्राम्हणे, अमोल ब्राम्हणे आणि त्यांच्यासोबत असलेल्या अज्ञात लोकांनी फिर्यादी यांच्या नातेवाईकांना रस्त्यात अडवून शिवीगाळ करत जोरदार धक्काबुक्की केली व त्यांना धमकावले. यानंतर अपघातातील गाडी फिर्यादीच्या नातेवाईकांच्या ताब्यातून बळजबरीने टोईंग करून पळवून घेऊन गेले. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहा. पो. नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार शिंदे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**कागदपत्रे हरवली**

मी रोहित दिलीप आसापुरकर, राहणार चितळी, तालुका राहता. मी बेंगलोरहून गावी चितळी, तालुका-राहता येथे येत असताना दिनांक १५ मे २०२३ रोजी प्रवासादरम्यान माझी काही कागदपत्रे गाळ झाली.

त्यात शाळा सोडल्याचा दाखला, मार्कलिस्ट या कागदपत्रांचा समावेश आहे. तरी ही कागदपत्रे कुणाला सापडली असल्यास किंवा त्याबद्दल कोणाला माहिति असल्यास माझ्याशी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

रोहित दिलीप आसापुरकर
रा.चितळी, ता.राहता,
जि.अहिल्यानगर
संपर्क : ९४०५५८४६९४

# अभ्यासात सातत्य ठेवल्यास यश निश्चित : आ. जगताप

## माजी उपमहापौर बोरुडे यांच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारातून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळत असते. जिल्हा परिषद व महापालिका शाळांच्या माध्यमातूनही अनेक गुणवंत विद्यार्थी घडत असल्याचे आज दिसून येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली असून विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यश संपादन करावे. शालेय शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य असून त्यांना योग्य मार्गदर्शनाची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

बोरुडे मळा येथे मनपा माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्यावतीने सलग २० वर्षापासुन गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळा आयोजित करून त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याचे कार्य अविरहीत चालु आहे. यंदाही दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी आ. जगताप, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भगवान फुलसौंदर, नगरसेविका पुष्पाताई बोरुडे, डॉ. रणजीत सत्रे, परुनाथ ढोकळे, मनीष अहुजा, अविनाश जाधव, पुष्कर कुलकर्णी, बाबासाहेब शिंदे, अभिजीत बोरुडे, स्वप्निल बोरुडे, प्रदीप बोरुडे अश्विनी बोरुडे, वैष्णवी बोरुडे, ओंकार बोरुडे, शरद बोरुडे, साई बोरुडे यांच्यासह विद्यार्थी, पालक व



नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशामागे आई-वडिलांचे मोठे योगदान असते. पालकांनी आपल्या मुलांसाठी पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारली पाहिजे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य बोरुडे कुटुंब सातत्याने करत आहे. माजी महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले की, आम्ही राजकारणात काम करताना सातत्याने जनतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनीही सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि शिस्त यांच्या जोरावर यश संपादन करावे. माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले की, प्रत्येक क्षेत्रात यश आणि अपयश हे येत असते. यश मिळाल्यानंतर हुरळून जायचे नाही आणि अपयश आले तर खचून जायचे नाही. आत्मविश्वास, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून अभ्यास केल्यास यश नक्कीच मिळते.

माजी सभापती पुष्पाताई बोरुडे म्हणाल्या की, गेल्या वीस वर्षांपासून बोरुडे कुटुंब विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याचे कार्य करते. यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्यावतीने सुमारे ४०० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे दिली. गेल्या वीस वर्षांपासून सुरू असलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा आणि शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक चळवळ म्हणून ओळखला जातो.

दखल

## सासवड पालिकेचे कर्मचारी दत्तात्रय खोमणे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव

**माळशिरस :** सासवड नगरपालिकेचे चतुर्थश्रेणी कर्मचारी दत्तात्रय यशवंत खोमणे हे नगरपालिकेची ३४ वर्षे सेवा करून नियत वयोमाना नुसार सेवानिवृत्त झाले त्या बद्दल त्यांचा पालिकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व त्यांच्या सेवांत निधीचा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला. नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप आरोग्य समितीचे सभापती राजनभय्या जगताप, पाणी पुरवठा सभापती माऊली गिरमे, नगरसेवक प्रदीप उर्फ बंडू राऊत यांसह सर्व खातेप्रमुख व कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. साकेत जगताप, राजनभय्या जगताप व मुख्याधिकारी चव्हाण यांनी मनोगतातून खोमणे यांना शुभेच्छा दिल्या. माऊलीं गिरमे यांनी खोमणे यांनी पाणी पुरवठा, आरोग्य विभाग, जकात आदी विविध विभागात अतिशय प्रामाणिक पणे सेवा केल्याची माहिती देत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले



## सासवडच्या सोपान नगरात आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**माळशिरस :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती,छत्रपती शिवरायांचा शिवराज्याभिषेक दिन व जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सासवड येथील सोपान नगर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रसिद्ध गोकुळ दहीहंडी उत्सव समितीच्या वतीने आयोजित या शिबिरात सुमारे २९३ लाभार्थ्यांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला येथील ॐ साई मित्र मंडळाच्या आवारात नेत्र तपासणी, चष्मे वाटप, रक्त तपासणी, कोल्यास्टर तपासणी, रक्तदाब, साखर तपासण्या, मॅमोग्राफी यांसह अनेक महागड्या तपासण्या तसेच उपचार या शिबिरात करण्यात आले आजच्या महागाईच्या दिवसांत सर्व सामान्यांसाठी अशा स्वरूपातील या शिबिराच्या आयोजनाबद्दल गोकुळ दही हंडी समितीचे संस्थापक अध्यक्ष आनंद (भय्या) संजय जगताप यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे. चंद्रकांत दादा पाटील समर्थ युवा फाउंडेशनचे या उपक्रमास विशेष योगदान लाभले. शेखर वढणे, गंगाराम जगदाळे, धनंजय कामठे, कैलास महाराज कावडे, डॉ सुमित काकडे, प्रवीण पवार, मंदार गिरमे, बाळासाहेब भिंताडे, यशवंतकाका जगताप, संजय जगताप, जयेंद्र निकम यांसह अनेक मान्यवरांनी हजेरी लावत उपक्रमास शुभेच्छा दिल्या.



## लघुलेखन मराठी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ३१ जुलैपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,औंध येथे स्टेनोग्राफी मराठी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्याकरिता हीींिं://ीलरींीं.शर्वी.ळप या संकेतस्थळावर ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईनपद्धतीने नोंदणी करावी. इच्छुक उमेदवारांना ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाकडून २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता २४ क्षमतेच्या मर्यादेत लघुलेखन मराठी या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकिया राबविण्यास मान्यता मिळालेली आहे. या अभ्यासक्रमाकरिता ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत तसेच प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रत संस्थेमध्ये ३१ जुलै पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. गुणवत्ता यादी १ ऑगस्ट रोजी तयार करण्यात येणार असून प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही ४ ऑगस्ट संस्थेच्या मुख्य इमारतीच्या कौशल्य सभागृहामध्ये होणार आहे व प्रवेशित उमेदवारांचे नियमित प्रशिक्षण ६ ऑगस्ट पासून सुरु होणार आहे, अशी माहिती उपप्राचार्य अ.अं. साबळे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

## 'पीएलएस' व 'एएसयुएसई' बाबत तळेगाव येथे कार्यशाळेचे आयोजन

**पुणे :** नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (पीएलएस) व असंघटित क्षेत्रातील उद्यामांचे वार्षिक सर्वेक्षणाच्या (एएसयुएसई) अनुषंगाने ५ ते १० जून या कालावधीत राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे येथे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त तसेच जिल्हाधिकारी हे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाचे सह आयुक्त सुनील जाधव यांनी दिली आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, कोलकाता यांच्यामार्फत 'पीएलएस' व 'एएसयुएसई'बाबत सर्वेक्षण माहे जानेवारी २०२६ पासून सुरु असून डिसेंबरपर्यंत करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणांचे क्षेत्रीय कामकाज अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या इप्सॉस रिसर्च प्रायव्हेट लि. मुंबई या संस्थेमार्फत करण्यात येणार आहे, असेही श्री. जाधव यांनी कळविले आहे.

# कांदा दरवाढी बाबत पुणे नाशिक महामार्गावर नंदी चौकात भव्य रास्ता रोको आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** कांद्याला किमान २५ रुपये प्रतिकिलो बाजारभाव मिळावा, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी आणि विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवार दि.२ रोजी तांबडेमळा येथील नंदी चौकात जोरदार आंदोलन केले. या आंदोलनात आंबेगाव, जुन्नर, शिरूर, खेड तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी, विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आंदोलन शांततेत व्हावे, कुठलाही गैरप्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

आंदोलनात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार निलेश लंके, आमदार रोहित पवार, माजी आमदार अशोक पवार, आमदार अतुल बेनके, आमदार बाबाजी काळे तसेच आंदोलनाचे निमंत्रक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासह शेतकरी सहभागी झाले होते.

सध्याच्या दरात भांडवली खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि कांद्याला हमीभावासारखा किफायतशीर दर मिळावा, या मागणीसाठी आंदोलन करण्यात आल्याचे आंदोलकांनी सांगितले. यावेळी राज्य व केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.त्यानंतर आंदोलक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार निलेश लंके, आमदार रोहित पवार, माजी आमदार अशोक पवार, आमदार अतुल बेनके, तसेच आंदोलनाचे निमंत्रक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासह शेतकरी सहभागी यांनी रस्त्यावर ठाण मांडत रस्त्यावर कांदा ओतून आंदोलन केले.यावेळी बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले कांदा उत्पादक शेतकरी आज आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडला आहे.शेतकऱ्यांना न्याय देण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरले असून तातडीने हस्तक्षेप आवश्यक आहे. निवडणुकी अगोदर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांद्याला बाजारभाव देऊ अशी घोषणा केली होती मात्र त्यांनी दिलेला शब्द पाळला नाही शेतकऱ्यांचा आक्रोश दिल्लीपर्यंत पोहोचवण्यासाठी आपल्याला तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल असेही रोहित पवार म्हणाले.

''राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे म्हणाले सरकारने तातडीने कांद्याचे बाजारभावा संदर्भात हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,म्हणाले राज्य आणि केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान होत आहे. आंदोलनाची वेळ संपल्याने पोलिसांनी आमदार रोहित पवार, आमदार बाबाजी काळे, निलेश लंके, देवदत्त निकम यांच्यासह आंदोलकांना ताब्यात घेऊन मंचर पोलीस ठाण्यात नेले.त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.




कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनात बोलताना आमदार रोहित पवार.आंदोलकांना ताब्यात घेताना पोलीस.

## जप्त वाहनांचा ऑनलाईन ई-लिलाव १० जून रोजी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड यांच्या वायुवेग पथकाने मोटार वाहन कायद्याअंतर्गत विविध गुन्ह्यांमुळे जप्त केलेली, तसेच मोटार वाहन कर न भरल्याने आणि संबंधितांनी हक्क सांगून न सोडवून घेतलेली एकूण ९३ वाहने ऑनलाईन ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत. ई-लिलाव १० जून २०२६ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत ु.ीिंलळपवळर.ले.ळपऋ या संकेतस्थळावर आयोजित करण्यात येईल. सदर वाहनांचा लिलाव 'भंगार' स्वरूपात करण्यात येणार असून, Registeed Vehicle Scapping Facility (RVSF) संस्थांना या लिलावात सहभाग घेता येणार आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेली सर्व वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड कार्यालयाच्या आवारात, राजगुरूनगर बस डेपो व मंचर बस डेपो येथे उपलब्ध असून इच्छुक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत प्रत्यक्ष पाहणी करता येणार आहे.

दरम्यान,संबंधित वाहन मालक, चालक, वित्तदाते किंवा हितसंबंधित व्यक्तींना लिलावाच्या तारखेपूर्वी शासकीय महसूल भरून किंवा आवश्यक कागदपत्रांसह हक्क सिद्ध करून वाहने सोडवून घेण्याची अंतिम संधी देण्यात आली आहे. तसेच लिलावाबाबत कोणतीही हरकत असल्यास ती लेखी स्वरूपात पुराव्यासह सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित कालावधीनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. ई-लिलावातील वाहनांची यादी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड येथे सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर ई-लिलाव रद्द करणे किंवा तहकूब ठेवण्याचा अधिकार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा कराधान प्राधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

## विधान परिषदेत महायुतीचे संख्याबळ वाढणार

### निवडणूक बिनविरोध झाल्यास अधिक चांगले वातावरण निर्माण होईल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार विक्रम काकडे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार दिलीप वळसे पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, सुनील शेळके, अनिल पाटील, शंकर मांडेकर, पुणे महापौर मंजुषा नागपुरे, आरपीआयचे उपमहापौर परशुराम वाडेकर व जय पवार यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आरपीआय पक्षाच्या नेतृत्वाखाली महायुतीने विक्रम काकडे यांना उमेदवारी दिली आहे. महायुतीचे उमेदवार निश्चितपणे विजयी होतील, असा आम्हाला पूर्णपणे विश्वास आहे. ही निवडणूक बिनविरोध झाली तर आणखी चांगले वातावरण निर्माण होईल. जागावाटपाबाबत समाधानकारक चर्चा झाली असून विधान परिषदेमध्ये महायुतीचे संख्याबळ वाढून अधिक प्रभावीपणे काम करता येईल.''

याप्रसंगी, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार दिलीप वळसे पाटील आणि जय पवार यांनीही महायुतीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला.



## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले असून राज्याने ६ लाखापेक्षा अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दलही कौतुक केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जांमध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला क्रमांक आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. या यशाबद्दल राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.



## 'वीरांचे वीर धर्मवीर' मधून उलगडला शंभूराजांच्या शौर्यगाथेचा थरारक आविष्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुरंदरच्या तहानंतरचा संघर्ष, स्वराज्यरक्षणासाठीच्या अखंड मोहिमा, औरंगजेबासमोर न झुकलेली जाज्वल्य भूमिका आणि धर्मासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान... असा छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील तेजस्वी क्षणांचा प्रवास 'वीरांचे वीर धर्मवीर' या दृकश्राव्य प्रयोगातून जिवंत झाला. शंभूराजांच्या जन्मापासून अमरत्वापर्यंतचा शंभूचरित्राचा हा प्रवास पडद्यासह अमोघ वाणीतून अनुभवताना उपस्थित पुणेकर इतिहासाच्या त्या सुवर्ण पण वेदनादायी पर्वाशी एकरूप झाले.

विवेक व्यासपीठ आयोजित 'वीरांचे वीर धर्मवीर' या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन एस. पी. कॉलेजमधील लेडी रमाबाई हॉल येथे करण्यात आले. या कार्यक्रमास महापौर मंजुषा दीपक नागपुरे, ह.भ.प. संग्राम भंडारे, दिपक नागपुरे, शि.प्र.मंडळी नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर, तुषार कुलकर्णी, महेश पवळे, यशोधन भिडे, वर्षा भोळे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन आणि सादरीकरण नीलेश रमेश भिसे यांचे असून, त्यांनी संभाजी महाराजांचे जीवन, त्यांचे कार्य, लेखन, विविध मोहिमा आणि युद्धनीती यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात केले. यावेळी अभिवाचन, चलचित्र, ॲनिमेशन, संगीत आणि प्रकाशयोजनेच्या माध्यमातून इतिहासातील विविध प्रसंग जिवंत केले.

मंजुषा नागपूरे म्हणाल्या, आजची तरुणपिढी ही आभासी माध्यमांच्या विळख्यात अडकत आहे. अशा वेळी या आभासी माध्यमाचाच वापर करून तरुणांसमोर आपला जाज्वल्य इतिहास मांडला जात आहे, हे कौतुकास्पद आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास केवळ युद्धातील पराक्रमांपरुता मर्यादीत नव्हता तर त्यांच्या अनेक पैलू होते. ते या कार्यक्रमात मांडले आहेत. इतिहास केवळ वाचून नाही, तर तो अनुभवातून जगला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. नीलेश भिसे म्हणाले, पराक्रमाची तलवार, विद्वत्तेचे तेज आणि धर्मरक्षणासाठीचे सर्वोच्च बलिदान यांचा संगम असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनप्रवास 'वीरांचे वीर धर्मवीर' या दृकश्राव्य प्रयोगातून साकारला. या चित्तथरारक दृकश्राव्य प्रयोगाने उपस्थितांना केवळ इतिहास दाखवला नाही, तर शंभूराजांच्या त्यागाची अनुभूतीही दिली, असेही त्यांनी सांगितले.ज्ञानदा भिसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

## नायगाव येथे पौर्णिमा उत्सहात साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** पुरंदरच्या तालुक्याच्या पुर्व भागातील श्री क्षेत्र नायगाव येथे अधिक जेष्ठ पौर्णिमेनिमित्त हजारो भाविकांनी श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांचा दर्शनाचा लाभ घेतला. पौर्णिमेनिमित्त पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर अशोक नामदेव खेसे यांच्या सौजन्याने ह.भ.प. ऋषिकेश महाराज चोरगे (वाणीभूषण) यांच्या सुश्राव्य किर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला. त्यांनी विविध उदाहरणे देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले.गायन साथ कोलते ,मोरे,चांगण महाराज यांनी दिली. मृदुंग साथ तेजस महाराज खेसे यांनी दिली.भजन साथ नायगाव भजनी मंडळाने दिली.श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापुजा पुजारी अरुण जगताप यांनी केली.त्यानंतर आरती होऊन महाप्रसाद झाला.अन्नदान अशोक नामदेव खेसे (नायगाव) यांनी केले. सुप्रिया चौंडकर,लक्ष्मण गोरावडे, राजेंद्र कड,बबन चौंडकर (नायगाव), सुनिता कुंजीर (वाघापूर ), सावता होले(कर्जत),प्रिया कुतवळ(कुतवळवाडी), दत्तात्रय बोत्रे (यवत), भानुदास कोतवाल (अष्टापूर),लता मगर (पानवडी),विठ्ठल खटाटे यांचे अन्नदान देणगीच्या स्वरूपात सहकार्य लाभले.मंदिर परिसराची स्वच्छता,लाईट,पाणी,दर्शनबारी आदिंची उत्तम व्यवस्था केली होती असे ट्रस्टचे राहुल कड यांनी सांगितले.



श्री क्षेत्र नायगाव(ता.पुरंदर) येथील श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची अधिक जेष्ठ पौर्णिमेनिमित्त बांधलेली आकर्षक महापुजा

## एसटीच्या ७८ वा वर्धापनदिन शिरूरमध्ये साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही केवळ वाहतुकीचे साधन नसून जीवनवाहिनी आहे. प्रवासी वाहतूक वाढविण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असल्याची भावना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८व्या वर्धापनदिनानिमित्त शिरूर बसस्थानकात आयोजित कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली. राज्यातील पहिली एसटी बस १ जून १९४८ रोजी पुणे-अहिल्यानगर मार्गावर धावली होती. त्यानिमित्त दरवर्षी १ जून हा दिवस एसटीचा वर्धापनदिन म्हणून साजरा केला जातो. यंदाही शिरूर बसस्थानकात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वर्धापनदिनानिमित्त बसस्थानक परिसराची स्वच्छता करून आकर्षक सजावट करण्यात आली होती. रांगोळ्या, फुलांची आरास, तोरणे आणि फुलमाळांनी सजविलेल्या एसटी बसमुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. ज्येष्ठ प्रवाशांच्या हस्ते केक कापून वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यानंतर प्रवाशांना पेढे, बर्फी तसेच गुलाबपुष्पांचे वाटप करण्यात आले.

यावेळी आगार व्यवस्थापक मनीषा गायकवाड यांनी शिरूर आगाराच्या कामकाजाची माहिती देताना सांगितले की, शिरूर बसस्थानकात २५० हून अधिक कर्मचारी कार्यरत असून दररोज १९३ बसगाड्या विविध मार्गांवर धावतात. तसेच सुमारे ३ हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी एसटीच्या सवलतीच्या प्रवास योजनेचा लाभ घेत आहेत. अधिकाधिक नागरिकांनी सुरक्षित, किफायतशीर आणि विश्वासार्ह असलेल्या एसटी सेवेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. सतीश धुमाळ यांनी एसटी ही सुरक्षित प्रवासाची हमी देणारी सेवा असून ग्रामीण भागाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात तिचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास वाहतूक निरीक्षक एन. बी. हवालदार, सहाय्यक वाहतूक निरीक्षक आर. बी. लंके, वाहतूक नियंत्रक डी. जी. दहिफळे, भरत माने, माधव मुंडे, चंद्रकांत वेताळ, सुनील देवरे, समीर झगडे, बाबू भोसले, वाहन परीक्षक सुनील जगताप, गणेश खटके, बापू फलके, वैशाली दांडेकर, आदर्श गंगावणे, सुजाता साबळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव मुंडे यांनी केले, तर समीर झगडे यांनी आभार मानले.




## मुंबई कृषी उत्पन्न बाजाराला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' दर्जा; आजपासून नवीन कायदा लागू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई, :-**आशिया खंडातील अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ म्हणून ओळखली जाणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीला आता राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार (चछख)म्हणून घोषित करण्यात आला असून तरतूदी प्रमाणे राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांची राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.अध्यक्ष पदाच्या पदभार पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज वाशी येथील कार्यालय जाऊन स्वीकारला. या नियुक्तीमुळे बाजाराच्या प्रशासनात आणि धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत अधिक प्रभावी समन्वय साधला जाणार आहे.

दरम्यान, नवीन व्यवस्थेच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले असून बाजाराचे प्रशासन आता नव्या कायदेशीर तरतुदींनुसार चालविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने २९ मे २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजाराला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्यपालांच्या आदेशानुसार ही अधिसूचना जारी करण्यात आली असून आजपासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली आहे.


या निर्णयामुळे मुंबई कृषी उत्पन्न बाजाराला राष्ट्रीय स्तरावरील महत्त्व प्राप्त झाले असून देशभरातील कृषी व्यापार, निर्यात आणि कृषी मालाच्या विपणन व्यवस्थेला अधिक गती मिळणार आहे. शेतकरी, व्यापारी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित घटकांना याचा मोठा फायदा होणार असल्याचे मानले जात आहे, जागतिक पणन व्यवस्थेशी स्पर्धा करण्याच्या दृष्टीने हे महत्वाचे पाऊल आहे.

राज्य शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे मुंबई बाजाराची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील ओळख अधिक मजबूत होणार असून कृषी विपणन क्षेत्रात महाराष्ट्राचे स्थान अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



द•ख•ल

## श्री क्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार धर्मदाय उपायुक्त नवनाथ जगताप यांनी स्वीकारला



**पाथर्डी** : महाराष्ट्र शासनाने नुकताच महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमामध्ये केलेल्या दुरुस्ती प्रमाणे व महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी दिलेल्या संमतीनुसार व अधिनियमातील तरतूदीनूसार, श्री मोहटादेवीचे पूजन करून श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार अहिल्यानगर जिल्हयाचे धर्मादाय उप आयुक्त नवनाथ जगताप यांनी नूकताच स्विकारला. याबाबत महाराष्ट्राचे विधी व न्याय विभागाने नुकतीच अधिसुचना प्रकाशित करून महाराष्ट्रातील महत्वाचे देवस्थानचे नियमन दिवाणी अथवा जिल्हा न्यायालयाकडे होते, ते रद्द करण्याचे राजपत्र प्रकासित करून आता धर्मादाय आयुक्त यांची नियुक्ती केलेली आहे. यावेळी देवस्थानचा पदभार स्विकारताना धर्मादाय उप आयुक्त नवनाथ जगताप यांनी भावीक भक्तांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देवून विश्वासाने देवस्थानचे कार्य यापुढेही सुरु ठेवू व देवस्थानचा नावलौकीक देशभरात वाढवू , श्रीक्षेत्र नाशिक येथे होत असलेला आगामी कुंभमेळा पर्वणी मध्ये मोहटादेवी गडावर येणाऱ्या भाविकाकरिता विशेष सुविधा देवस्थान मार्फत उपलब्ध करून दिल्या जातील, तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य अमोघ कलोती यांचे मार्गदर्शनाखाली चांगला व पारदर्शक कारभार करु, मंदिर परिसर विकास कामावर भर देवू असे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी मंदिर परिसर व दानपेटी मोजदाद कार्यक्रमाची पाहणी केली. याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त अँड, विक्रम वाडेकर, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, शशिकांत दहिफळे, राजेंद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखपाल संदीप घुले तसेच सौ. ममता सुरदुशे (अधीक्षक) विनोद पाटील (निरीक्षक), जिजाबा कुंजीर, श्री कानिफनाथ देवस्थान मढीचे विश्वस्त महादेव कोकाटे, व देवस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## शिराळमध्ये अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**शिराळ चिचोंडी** : शिराळ येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१व्या जयंती शिराळयेथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अहिल्यादेवीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीनेझाली उपस्थितच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यांच्या लोककल्याणकारी कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाज हिताचे कार्य करण्याचा संकल्पही ग्रामस्थांनी व्यक्त केला. धनगर समाजाच्या वतीने भव्य दिव्य वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. लहान मुलांचे यावेळी भाषणे झाली. या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात ग्रामपंचायत दहिगाव शे.चा तालुक्यात प्रथम क्रमांक



**एरंडगाव** : राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत घेण्यात आलेल्या मूल्यमापन प्रक्रियेत ग्रामपंचायत दहिगाव शे. यांनी तालुका स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. ग्रामपंचायतीने विविध विकासकामे, स्वच्छता, लोकसहभाग, पारदर्शक प्रशासन तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी यामध्ये उत्कृष्ट कार्य केल्यामुळे हा मान मिळाला. तालुका स्तरावरील यशानंतर आता जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी ग्रामपंचायत दहिगाव शे.ची निवड करण्यात आली आहे. शेवगाव पंचायत समिती गटविकास अधिकारी सोनल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली या गावांमध्ये अनेक योजना राबवून लोकसहभागातून अनेक विविध कामे करण्यात आली. हे गाव जिल्हा स्तरापर्यंत पोहोचले. याअनुषंगाने जिल्हास्तरीय सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे व समितीने ग्रामपंचायतीची प्रत्यक्ष पाहणी केली. समितीच्या सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या विकासकामांची, उपलब्ध सुविधांची तसेच विविध योजनांच्या अंमलबजावणीची सविस्तर माहिती घेतली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांनी समितीसमोर गावातील प्रगतीची माहिती मांडली. ग्रामपंचायत दहिगाव शे च्या या यशाबद्दल गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, जिल्हा स्तरावरही ग्रामपंचायत उत्कृष्ट कामगिरी करून गौरव मिळवेल, असा विश्वास सरपंच रामेश्वर भापकर यांनी व्यक्त केला.

## श्रीगोंदा-मांडवगण रोडवरील गॅस पाईपलाईन फुटली; वाहतूक ठप्प, नागरिकांची गैरसोय

**लिंपणगाव** : श्रीगोंदा-मांडवगण रोडचे रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी शासनाकडून तब्बल २१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाची अंमलबजावणी कृष्णाई इन्फ्रा कंपनीकडून केली जात आहे. दरम्यान, गणपती मळा परिसरात रस्त्याचे काम सुरू असताना गॅस पाईपलाईन फुटल्याची घटना घडल्याने परिसरात काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. शनिवारी गणपती मळा परिसरात खोदकाम सुरू असताना कर्मचाऱ्यांकडून अनवधानाने भूमिगत गॅस पाईपलाईनला धक्का लागला. त्यामुळे गॅस गळती सुरू झाली आणि परिसरात तीव्र वास पसरला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नागरिकांनी तातडीने संबंधित यंत्रणा व अग्निशमन दलाला माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच संबंधित विभागाचे अधिकारी व तांत्रिक कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ उपाययोजना करून गॅस गळती नियंत्रणात आणली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा मोठे आर्थिक नुकसान झाले नाही. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव श्रीगोंदा-मांडवगण मार्गावरील वाहतूक दोन दिवसांसाठी बंद ठेवण्यात आली. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः बस सेवा पूर्णपणे बंद झाल्याने शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक तसेच नोकरदार वर्गाला ये-जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून रस्ते विकासाच्या कामांदरम्यान आवश्यक सुरक्षा उपाययोजना आणि भूमिगत सुविधांची अचूक माहिती घेऊनच खोदकाम करावे.

# शेत शिवार सजलं खरीपासाठी!

## स्वप्न रुजली ; प्रतीक्षा पेरणीयोग्य पावसाची

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतशिवार पेरणीसाठी सज्ज केले आहे. मशागतीची बहुतांश कामे पूर्ण झाली असून नांगरणी तसेच शेतीची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. त्यामुळे आता बळीराजाच्या नजरा आकाशाकडे लागल्या असून समाधानकारक पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा सुरू आहे.

बळीराजाने मोठ्या अपेक्षेने शेतीची मशागत करून ठेवली आहे. खरिपासाठी रान.. शेत शिवार सज्ज झाले असून



खरीप हंगामातील पिकांची पेरणी करण्यासाठी जेऊर परिसरात बळीराजांनी पेरणीपूर्व मशागत करून सज्ज केलेले शिवार

बळीराजाच्या नजरा आता आभाळाकडे लागलेल्या आहेत. खरीप हंगामासाठी काळ्या आईची कुस तयार झाली असून यंदा चांगल्या पावसाच्या आशेने शेतकऱ्यांनी बियाणे, खते व अन्य कृषी साहित्याची तयारी करून ठेवली आहे. शेतांमध्ये पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्णत्वास आली आहेत. आता पेरणीसाठी आवश्यक असलेला दमदार व सातत्यपूर्ण पावसाची शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे.

मान्सून वेळेत आणि समाधानकारक बरसल्यास खरीप हंगामाला चांगली सुरुवात होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या शिवार सज्ज असून पावसाच्या सरींची आतुरतेने वाट पाहत बळीराजा नव्या हंगामाच्या स्वप्नांना आकार देत आहे. नगर तालुक्यात खरीप हंगामात बाजरी, मुग, सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

खरीप हंगामात मान्सून वेळेवर आल्याने सर्वच पिकांची पेरणी करता येत असते. परंतु वरुणराजाने उशीर केल्यास खरिपासह रब्बी हंगामातील नियोजनही कोलमडत असते. पेरणीपूर्वीची मशागतीची कामे बहुतांशी भागात पूर्ण झाली आहेत. मागील वर्षी अतिवृष्टी होऊनही उन्हाळ्यात अनेक गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागला आहे. अशा गावांची तहान भागवण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. अशा गावांनी देखील वरुणराजाची प्रतीक्षा आहे.

शेताची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. आता फक्त पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा असून, वेळेत चांगला पाऊस झाल्यास खरीप हंगामाला चांगली सुरुवात होईल. रान सज्ज आहे. बियाणं तयार आहे. आता फक्त आभाळाने साथ द्यावी एवढीच बळीराजाची अपेक्षा आहे.

**सोपान आव्हाड (पांगरमल)**

### मशागतीला पूर्णविराम ; बळीराजाच्या नजरा आभाळाकडे ; काळ्या आईची कुस तयार

खरीप हंगामामध्ये मूग, बाजरी, सोयाबीन व चारा पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणात करण्यात येते. मान्सूनच्या सुरुवातीलाच वरुणराजाने कृपा दाखविल्यास खरीप हंगामातील सर्वच पिकांची पेरणी होत असते. शेतीची पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण झाली असून आता पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा आहे.

**उल्हास जरे (इमामपूर)**

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सारोळा सोमवंशी प्रथम


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**देवदैठण** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात येळपणे गटातील सारोळा सोमवंशी गावाने एकजुटीने ग्रामविकास करत श्रीगोंदा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत श्रीगोंदा तालुकास्तरीय गुणांकन आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचे नुकतेच निकाल जाहीर झाले आहेत. यामधे 'लोकसहभागातून होणार ग्रामीण समृद्धी' हे प्रमुख सूत्र डोळ्यांसमोर ठेवून राबवलेल्या या अभियानात श्रीगोंदा तालुक्यातील सारोळा सोमवंशी ग्रामपंचायतीने प्रशासकीय पारदर्शकता आणि विकासकामांच्या जोरावर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर या स्पर्धेत कोळगाव ग्रामपंचायतीने द्वितीय आणि मुंगुसगाव ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळविला आहे. शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत या अभियानांतर्गत विविध कडक निकषांच्या आधारे या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत ग्रामपंचायतींचे काटेकोर मूल्यांकन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत वैयक्तिक आणि सार्वजनिक योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे. आर्थिक शिस्त व पारदर्शकता, ग्रामपंचायत दप्तर अद्ययावत असणे, करवसुलीचे शंभर टक्के उद्दिष्ट आणि डिजिटल कारभार, स्वच्छ भारत अभियान, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, वृक्षारोपन, सौर ऊर्जेचा वापर आणि दर्जेदार रस्ते निर्मिती, गावाच्या निर्णय प्रक्रियेत आणि ग्रामसभांमध्ये ग्रामस्थांचा, विशेषतः महिलांचा सक्रिय सहभाग या सर्वच आघाड्यांवर उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत सारोळा सोमवंशी ग्रामपंचायतने तालुक्यात अव्वल स्थान मिळवले.

## मुरकुटे यांनी सर्वसामान्यांसाठी व गाव विकासासाठी मोठे योगदान


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : ग्रामपंचायत अधिकारी श्री लक्ष्मण बुरकुटे यांनी ग्रामपंचायत मार्फत सर्वसामान्यांसाठी व गाव विकासासाठी कल्याणकारी योजना राबवल्या असून त्यांचे मोठे एकदम लाभले असल्याचे गौरवद्गार पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठलराव नागवडे यांनी व्यक्त केले. वांगदरी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने ग्रामसेवक लक्ष्मण विठ्ठल मुरकुटे यांच्या सेवापुर्ती चा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे होते.

यावेळी भावनिक होत सेवानिवृत्त ग्रामसेवक लक्ष्मण मुरकुटे म्हणाले की, ३५ वर्ष ग्रामसेवक म्हणून २१ गावांमध्ये काम करत असताना अखेरचे तीन वर्षांमध्ये वांगदरी येथे सेवा करण्याची संधी मिळाली. व गावचा पाठिंबा यामुळे अखेरचे दिवस अतिशय उत्साही वातावरणामध्ये घालवता आले. सेवेमध्ये राष्ट्रीय पुरस्काराने देखील सन्मानीत करण्यात आले. ही प्रामाणिक कामाची पावती असल्याचे मत मुरकुटे यांनी बोलताना व्यक्त केले. याप्रसंगी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुरकुटे भाऊसाहेब यांच्या कामाचे कौतुक केले व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक मा.सरपंच संजय नागवडे यांनी केले व त्याच्या कार्याचा गौरव केला. या प्रसंगी पंचायत समिती सदस्य विठ्ठल नागवडे, मा.सरपंच आदेश नागवडे, संचालक सुभाष गोरे, मा.चेअरमन रामचंद्र नागवडे, बापूराव कांबळे, विश्वनाथ मोहिते, मा.सरपंच दत्तात्रय मासाळ, काशिनाथ पारखे, शिक्षक नेते आबासाहेब जगताप, तुषार नागवडे, यांनी मनोगत व्यक्त केले.

## लोणी व्यंकनाथ मध्ये भूमिपुत्रांचा सत्कारांचा वर्षाव



**लिंपणगाव** : लोणीव्यंकनाथ ग्रामपंचायत व अग्नीपंख फौंडेशन च्या वतीने भारतीय सैन्य दलातील जवान, सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षण अधिकारी व भारतीय सैन्य दलात भरती झालेल्या जवानांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव केला. अध्यक्षस्थानी माजी उपसभापती गणपतराव काकडे होते. यावेळी सेवानिवृत्त जवान नितीन काकडे, शिक्षक डी. आर. काकडे, रामदास साळवे, राजाराम गायकवाड, रामदास फटाकडे, शिवाजी जाधव व सैन्य दलात भरती झालेला जवान अर्जुन धोत्रे यांचा सन्मान सरपंच मनीषा नाहाटा, उपसरपंच चित्राताई धाकड, तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानदेव बापु मगर, बाळासाहेब थोरात, लाला काकडे, गोरख ओव्हळ यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक बाळासाहेब नाहाटा यांनी केले.

## चौघा पोलीस अंमलदारांची पीएसआयपदी निवड

**लिंपणगाव** : महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या डिपार्टमेंटल पोलीस उपनिरीक्षक परीक्षा २०२३ च्या निकालात श्रीगोंदा पोलीस ठाण्यात कार्यरत राहिलेले चार पोलीस अंमलदार पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पात्र ठरले आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे पोलीस विभागासह श्रीगोंदा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. दि. ३० एप्रिल २०२६ रोजी जाहीर झालेल्या निकालानुसार पोलीस अंमलदार अनिल रघुनाथ साठे, दादासाहेब भाऊसाहेब टाके, संजय बाळासाहेब कोतकर आणि आदित्य सुभाष बेल्हेकर यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली आहे. कर्तव्य बजावत असतानाच त्यांनी स्पर्धा परीक्षेची मेहनतीने तयारी करून हे यश संपादन केले आहे. त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून पोलीस दलातील इतर कर्मचाऱ्यांसाठीही त्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

## श्रीगोंदा पोलिसांची अवैध धंद्यांवर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या विशेष पथकाने अवैध दारू व जुगार व्यवसायाविरोधात मोठी मोहीम उघडली. गेल्या महिनाभरात तब्बल ६७ ठिकाणी धाड टाकून ८५ आरोपींवर कारवाई केली आहे. या कारवाईत एकूण ३५ लाख ५५ हजार ४४३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तालुक्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दि. १ मे ते ३१ मे या कालावधीत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या नेतृत्वात श्रीगोंदा, बेलवंडी आणि मिरजगाव पोलीस हद्दीत विशेष मोहीम राबविण्यात आली.दारूबंदी कारवाईत श्रीगोंदा हद्दीत ५३ गुन्हे दाखल करून ५५ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून १ लाख ७० हजार ८३४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बेलवंडी येथे ४ गुन्ह्यांत ४ आरोपींवर कारवाई करून ९६ हजार ७५४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मिरजगाव येथे ३ गुन्ह्यांत ३ आरोपींना पकडून २३ हजार ४८५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तर जुगार अड्ड्यांवरही पोलिसांनी छापे टाकले. श्रीगोंदा हद्दीत ६ गुन्ह्यांत १५ आरोपींवर कारवाई करून ६ हजार ५७० रुपये जप्त करण्यात आले. बेलवंडी हद्दीत एका मोठ्या कारवाईत १० आरोपींना पकडून तब्बल ३२ लाख ५७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.विशेष म्हणजे दि. १ जूनला एका दिवसात १७ ठिकाणी छापेमारी करून १७ आरोपींविरुद्ध १७ गुन्हे दाखल करण्यात आले. ५६ हजार ८०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्व मोहिमेत पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्त कारवाई केली. अवैध धंदेवाल्यांसाठी आता श्रीगोंद्यात 'नो एंट्री' बोर्ड लागलाय, अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. दरम्यान, १ महीन्याच्या कालावधीत एकूण ८४ ठिकाणी छापेमारी करून ३६ लाख २२ हजार २४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## शेत वहिवाट, शिवरस्ते, खुले करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांच्या संघर्षाला आणि शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने दि. २ जूनला ग्रामीण भागातील शेत वहिवाट रस्ते, पाणंद रस्ते, गावजोड रस्ते, गाडीमार्ग व पायवाटांवरील अतिक्रमणे काढण्याच्या प्रक्रियेला मोठी गती देणारे आदेश दिले आहेत.

या परिपत्रकात महत्त्वाचे मुद्दे, पोलीस बंदोबस्त पूर्णपणे मोफत, शेत वहिवाट रस्ते, पाणंद रस्ते व गावजोड रस्त्यांवरील अतिक्रमण काढताना किंवा सीमांकन करताना आवश्यक असलेला पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस विभागाकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मोजणी व सीमांकन शुल्कही माफ भूमी अभिलेख विभागामार्फत शेतरस्त्यांची मोजणी, सीमांकन व हद्द निश्चिती करताना कोणत्याही प्रकारचे मोजणी शुल्क आकारले जाणार नाही.

यामुळे गरीब व सर्वसामान्य शेतकऱ्यांनाही त्यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी न्याय मिळवणे अधिक सोपे होणार आहे.अतिक्रमणधारकांवर कठोर कारवाई, गाव नकाश्यात दर्शविलेल्या शासकीय रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांना प्रथम नोटीस देण्यात येईल. जर नोटीस मिळाल्यानंतरही अतिक्रमण काढले नाही तर महसूल प्रशासनाकडून ते अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांना पोलीस संरक्षण अतिक्रमण काढण्याच्या प्रक्रियेदरम्यान तणाव निर्माण होऊ नये यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण दिले जाईल. प्रशासनाच्या कारवाईत अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. सर्व विभागांना स्पष्ट आदेश तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक, भूमी अभिलेख अधिकारी आणि संबंधित सर्व यंत्रणांना या परिपत्रकाची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांसाठी याचा नेमका फायदा काय? शेतात जाण्यासाठी कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध होईल. ट्रॅक्टर, हार्वेस्टर, बैलगाडी व शेतीमाल वाहतुकीला अडथळे राहणार नाहीत.

## प्रशासनात जनताभिमुख कार्याने सन्मानाची सेवापूर्ती : तहसीलदार

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : प्रशासकीय खुर्चीत काम करताना जनताभिमुख निर्णय घेतल्यास निश्चित त्याचे समाधान वेगळे असते. कर्तव्य बजावताना पदापेक्षा त्या सेवेने आनंद मिळायला हवा. तेव्हा सेवापूर्तीस त्यांनी कमावलेली माणसे जमतात. अधिकारी म्हंटल की वेळप्रसंगी कठोर वाणी ठेवावीच लागते. मात्र तो देखील एक माणूस आहे. त्याला पण भावना असणारे मन आहे. सन्मानाची सेवापूर्ती खूप कमी माणसाच्या आयुष्यात येते. ते सन्मान मिळवण्यासाठी लोकाभिमुख कार्य पार पाडले पाहिजे असे प्रतिपादन कर्जत तहसीलदार रवी सतवन यांनी केले. ते कर्जत पोलीस विभाग आयोजित सेवापूर्ती सन्मान सोहळ्या प्रसंगी बोलत होते.

कर्जतचे पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट आणि होमगार्ड पथकाचे सतीश सोनमाळी यांच्या प्रदीर्घ सेवेनंतर रविवारी सेवानिवृत्त झाले. या प्रसंगी कर्जत पोलीस विभागाच्यावतीने तिन्ही सेवानिवृत्त अधिकाऱ्यांवर पुष्पवृष्टी करीत हलगीच्या निनादात शहरातून मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी कर्जतचे नूतन पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड, श्रीगोंदा पोलीस निरीक्षक किरण शिंदे, जामखेड पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, सहायक पोलीस निरीक्षक रमीज मुलाणी, बेलवंडीचे नंदकुमार सोनवलकर, प्रदीप बोऱ्हाडे, मिरजगावचे विजय झंजाड, कर्जत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अक्षय जायभाये आदी उपस्थित होते.

सेवापूर्ती काळात अधिकारी खुर्चीत बसून कामकाज पाहतो. मात्र पोलीस उपअधीक्षक लोखंडे यांनी सेवाकाळाच्या शेवटच्या क्षणापर्यंत आपले कर्तव्य बजावत होते. चोंडी (ता.जामखेड) येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त तेवढ्याच तत्परतेने काम करताना पाहून एका युवकाला लाजवेल अशी ड्युटी लोखंडे यांनी बजावली. अशा अधिकाऱ्यांसोबत काम करताना आम्हाला देखील शिकायला मिळाले असे सहकारी अधिकाऱ्यांनी आपल्या भाषणात सांगितले.



यावेळी बोलताना श्रीगोंदयाचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे म्हणाले की, पोलिसांना सण-उत्सव कधीच कुटुंबासोबत साजरे करता येत नाही ही शोकांतिका आहे. सर्वसामान्य नागरिक कुटुंबात असताना आम्ही तुमच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर कर्तव्य बजावतो. अनेकदा रक्षाबंधन आणि भाऊबीज साजरी करता येत नाही. मात्र आता जे क्षण साजरे झाले नाही ते सर्व क्षण नव्याने आणि आनंदाने साजरे करावे अशा शुभेच्छा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी सत्कारास उत्तर देताना पोलीस उपअधीक्षक लोखंडे म्हणाले की, प्रशासकीय सेवेत काम करताना मनातील आवाज ऐकून काम केले पाहिजे. विशेष म्हणजे पोलीस प्रशासनात अविरत काम करावे लागते. कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कायम तत्पर राहत कायद्याच्या चौकटीत काम केल्यास जनता देखील त्या अधिकाऱ्यांस मान-सन्मान देते. प्रशासकीय खुर्चीत काम करताना कायम समाधान मिळेल असेच काम करा. मात्र त्या खुर्चीला कधीच विसरू नका. जिने आपल्या सर्व इच्छा अपेक्षा पूर्ण केल्या. कारण माणूस कधीच सेवानिवृत्त होत नाही. तो शेवटपर्यंत आपले काम बजावतो. समाजात खूप चांगली माणसे आहेत. त्याची कदर करा. पदाने माणूस मोठा होत नाही. त्याच्या कर्तृत्वाने तो लक्षात राहायला पाहिजे असे कार्य करा असे आवाहन उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना केले. यावेळी पोलीस कर्मचारी सागर जंगम, नानासाहेब वाघमारे, पत्रकार गणेश जेवरे, प्रणव लोखंडे, गौरी लोखंडे यांची भाषणे झाली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.३ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## अज्ञात चोरट्यांकडून अल्युमिनियम इलेक्ट्रीक कंडक्टर तार लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील सादतपूर शिवारातून अज्ञात चोरट्यांनी तब्बल १ लाख ४० हजार रुपये किमतीची अल्युमिनियम इलेक्ट्रीक कंडक्टर तार लंपास केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, आश्वी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कॉन्ट्रॅक्टर गणेश सांगळे यांनी याबाबत दिली फिर्याद आहे. त्यात म्हटल्याप्रमाणे बुधवार, दि. २७ मे २०२६ ते शुक्रवार, दि. २९ मे २०२६ या कालावधीत सादतपूर ते गोगलगाव शिवरस्त्यावर असलेल्या सहा वीज खांबांवरील १५०० मीटर लांबीची १०० एमएम स्क्वेअर जाडीची डबल सर्किट अल्युमिनियम इलेक्ट्रीक कंडक्टर तार चोरट्यांनी कापून चोरून नेली आहे. त्यामुळे या प्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ११९/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेंद्र पारधी करत आहेत.

# समृध्दी महामार्गावर प्रवाशांना लुटणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : समृद्धी महामार्गावर कोपरगाव तालुका हद्दीत प्रवाशांचे वाहन आडवून लूटणारी आणि डिझेल चोरणारी आंतरजिल्हा टोळी अहिल्यानगर गुन्हे शाखेने जेरबंद केली. या टोळीतील सहा जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून ९ लाख ३० हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. (दि.२७, ते २८) मे रोजी कोपरगाव तालुका हद्दीतील समृद्धी महामर्गावर लुटमारीच्या तीन घटना घडल्या होत्या.त्यातील दत्ता बाबुराव राजुळे (रा. लांबोटा, जि.लातूर) हे ट्रकमधून डिझेल घेवून जात असताना सात ते आठ जणांनी अडविले.



लोखंडी रॉडने मारहाण करुन गाडीमधील डिझेल तसेच राजुळे यांच्या कडील साडेसात हजार रुपये जबरदस्तीने काढून घेण्यात आले होते.याशिवाय एक कार अडवून गाडीमधील पती-पत्नीला दमदाटी करुन १ लाख २४ हजार रूपये किमतीचे दागिने व रोख रक्कम पळविली.त्याच आरोपीनी बी आर ०३ जीबी ४८८३ क्रमांकाच्या ट्रकचालकाला मारहाण करुन त्यांचे ट्रकमधील १५० लिटर डिझेल व चार हजार रूपये बळजबरीने चोरुन नेले होते.या घटनेबाबत कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक मुम्मका एम सुदर्शन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली होती.पोलिस अधिक्षकांनी गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार विजय पवार, फुरकान शेख, भिमराज खर्से, राहुल डोके, सतिष भवर, रोहित येमुल, सुनिल मालणकर, प्रशांत राठोड, प्रमोद जाधव, महादेव भांड यांच्या पथकाने फिर्यादीकडून आरोपीचे वर्णन जाणून घेतले. त्यानंतर आरोपींचा शोध घेत असताना (दि.१) जून रोजी पथकास गुन्ह्यातील काही आरोपी हे जालना जिल्ह्यातील अंबड परिसरामध्ये असल्याची माहिती मिळाली. हे पथक अंबडला गेले तिथे निखील बद्रीनारायण गोरे (वय १९, रा. नुतन वसाहत, अंबड, जि. जालना) व एका विधीसंघर्षित बालकाला पथकाने ताब्यात घेतले.

त्यांची विचारपूस केली तेव्हा त्यांनी इतर साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर (दि.२) जून रोजी कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथून शिवनाथ शांताराम आव्हाड (रा. शिर्डी), ओम बालाजी खरात (रा. मोतीबाग, ता. जि. जालना), राहुल साधाकिसन कोकाटे (रा. पांग्रा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर), मुळ रा.रांजणगाव, जि.जालना), साईराज गणेश शहाणे (रा.साकुरी, ता. राहाता) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी देखील गुन्हा केल्याची कबुली दिली. या समृद्धी महामार्गासारख्या महत्त्वाच्या वाहतूक मार्गावर झालेल्या या गुन्ह्याचा अवघ्या चार दिवसात छडा लावल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

### आरोपी व मुद्देमाल कोपरगाव पोलिसांच्या स्वाधीन

समृद्धी महामर्गावर प्रवाशांना लुटणाऱ्या सहा जणांना अटक केल्यानंतर त्यांच्या ताब्यातून व्हेरना, स्विफ्ट कार, सहा मोबाईल, रोख रक्कम असा एकुण ९ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखेने हस्तगत केला आहे.आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी कोपरगाव तालुका पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला.

## सोनईच्या मुळा कारखाना निवडणुकीत विरोधकांची पिछेहाट?

# सत्ताधारी गडाख गटाचे उमेदवार बिनविरोध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्राचे लक्ष लागलेल्या मुळा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडणुकीत नामांकन अर्जांच्या आकडेवारीने सत्ताधारी गटाचे वर्चस्व स्पष्ट झाले आहे. निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही, अशी भूमिका विरोधी गटाने सुरुवातीपासून घेतली होती. मात्र नामांकन अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी समोर आलेल्या आकडेवारीमुळे विरोधी गटाची ताकद अपेक्षेपेक्षा कमी पडल्याचे चित्र दिसून येत आहे. कारखान्याच्या २१ संचालक पदांसाठी एकूण ९४ नामांकन अर्ज दाखल झाले आहेत.

यामध्ये माजी आमदार शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी गटाकडून ८१ अर्ज, तर आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या नेतृत्वाखालील विरोधी गटाकडून केवळ १३





**मुळा कारखाना आकडेवारी काय सांगते?**
**संचालक पदे-२१**
**एकूण नामांकन अर्ज-९४**
**सत्ताधारी गडाख गटाचे अर्ज-८१**
**विरोधी आ.लंघे गटाचे अर्ज-१३**

अर्ज दाखल करण्यात आले आहेत. नामांकन अर्जांच्या तपशीलावरून काही मतदारसंघांमध्ये विरोधी गटाचा उमेदवारच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः सोसायटी मतदारसंघातून विरोधी गटाचा एकही अर्ज दाखल न झाल्याने माजी आमदार शंकरराव गडाख यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग जवळपास मोकळा झाल्याची चर्चा सुरू आहे. याशिवाय इतर मागासवर्गीय (ओबीसी), अनुसूचित जाती आणि घोडेगाव गटामध्येही विरोधी उमेदवार नसल्याने त्या जागांवर बिनविरोध निवडीची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

या आकडेवारीवरून सत्ताधारी गटाने सर्वच मतदारसंघांमध्ये मजबूत तयारी केल्याचे दिसून येत आहे. तर अनेक जागांवर उमेदवार उभे करण्यात विरोधी गटाला अडचणी आल्याचे चित्र समोर आले आहे. भाजप व मित्रपक्षांत नाराजीची चर्चा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधी गटातील घटक पक्षांमध्ये उमेदवार निवडीवरून नाराजी असल्याची चर्चा तालुकाभर सुरू आहे. काही कार्यकर्त्यांनी उमेदवारी वाटप करताना स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले गेले नसल्याची भावना व्यक्त केल्याचे बोलले जात आहे.राजकीय जाणकारांच्या मते, उमेदवार निवडीत समन्वयाचा अभाव राहिल्याने विरोधी गटाला सर्व मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करता आले नाहीत. परिणामी काही जागांवर सत्ताधारी गटाला थेट बिनविरोध संधी मिळाल्याचे मत व्यक्त होत आहे. आता नामांकन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता दि. ३जून रोजी अर्ज छाननी व माघारीच्या टप्प्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अंतिम उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर कोणत्या मतदारसंघांत थेट लढती रंगणार आणि कोणत्या जागा बिनविरोध होणार, हे स्पष्ट होणार आहे.

सध्या तरी नामांकन अर्जांच्या आकडेवारीवरून मुळा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत सत्ताधारी गटाचे पारडे जड असल्याचे चित्र दिसत असून विरोधी गटासमोर संघटनात्मक ताकद सिद्ध करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## अखेर श्रीरामपूरचे ऐतिहासिक घड्याळाची टिक-टिक सुरु

### दै.राष्ट्र सह्याद्रीने केला होता पाठपुरावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहराची ओळख असलेल्या नगरपालिकेचे नेहरू मार्केट येथील भाजी मंडईमध्ये असलेले टॉवरवरील घड्याळ अखेर सुरू झाले आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, श्रीरामपूर शहराच्या जडणघडणीत पालिकेच्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी जवळपास पाच-पन्नास वर्षांपूर्वी हे नेहरू भाजी मंडईच्या ठिकाणी मोठे टॉवर उभारून त्यावर भव्यदिव्य घडयाळ उभारले होते.या घड्याळामुळे शहरातील नागरिकांना सहज वेळ पहायला मिळत असे.

जेव्हा हे घड्याळ उभारले त्यावेळी शहरात मोठ्या बिल्डींग नव्हत्या.त्यामुळे सहजपणे हे घड्याळ नजरेस पडायचे.नव्हेतर धड्याळ ही श्रीरामपूर म्हणजेच बेलापूर रेल्वे स्टेशनची ओळख समजली जायची हे विशेष.गेल्या, काही पहिन्यांपासून सदर घड्याळ बंद स्थितीत होते. त्याची दुरावस्था झालेली होती.

त्यामुळे हे घड्याळ दुरूस्त करण्याची सर्वप्रथम मागणी दै.राष्ट्र सह्याद्रीने ज्वलत या विषयाला वाचा फोडली होती.त्यानंतर माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे यांनी हे घड्याळ सुरू करण्याचा मुद्दा पुढे करत आंदोलन होते. तेव्हा १५ दिवसात हे घड्याळ सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले.त्यानंतर हे घडयाळ सुरू होते, की यांची उत्सुकता लागली होती. मात्र, हे घड्याळ आता नगरपालिकेने दुरूस्त करून सुरू केले आहे.छल्लारे यांनी यशस्वी पाठपुरावा केला.आता यापुढे सदर घडयाळाची देखभाल पालिकेने वेळच्यावेळी केल्यास शहराची ओळख असलेल्या घड्याळाची टिक -टिक कायम पहायला मिळेल.

## बेलापूरात विवाहितेचा छळ

### संशयित नजरेने बघते असा आरोप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : संशयित नजरेने बघते असा आरोप करत विवाहितेचा छळ करण्याचा प्रकार तालुक्यातील बेलापूर येथील गोखलेवाडी येथे घडला आहेत. याबाबत, कल्याणी निलेश कुऱ्हे या पीडितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आपला विवाह जुलै २०२४ मध्ये निलेश सोपान कुऱ्हे यांच्यासोबत झाला. महिनाभर पती व सासरचे आपल्याशी चांगले वागले. नंतर पती नोकरीनिमित्त पुण्याला निघून गेले.त्यानंतर सासरी राहत असताना दोन महिन्यांनंतर आपले सासरे हे माझ्याकडे संशयित नजरेने बघू लागले. त्यानंतर ही बाब आपण सासूला सांगितली, मात्र आपणच संशयित नजरेने पाहत असल्याचा आपल्यावर आरोप करण्यात आला.यावेळी सासरचे लोक, नणंद यांनी संगनमत करून मानसिक त्रास द्यायला सुरूवात केली, मारहाण केली. आमच्याकडे खुप पैसे असून तुला घरकाम करण्यासाठी या घरात आणले आहे. तुझा आणि नवऱ्याचा काहीएक संबंध नाही, असे म्हणत आपल्याला घराबाहेर रात्रभर ठेवून आपल्याला त्रास द्यायचे,असे फिर्यादीत म्हटले आहे. सदर फिर्यादीवरून निलेश सोपान कुऱ्हे सोपान कुऱ्हे, मंगल कुऱ्हे, योगेश कुऱ्हे, प्रमिला कुऱ्हे अश्विनी मेहेत्रे, राहुल मेहेत्रे, अर्जुन कुऱ्हे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहे.

## जनगणनेचे काम नसतानाही शिक्षकांच्या बदल्या थांबविल्या

# पेसा क्षेत्रातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांची थट्टा

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : महसूल नगर विकास तसेच आदिवासी अशा शासनाच्या काही विभागांमध्ये शासनाचे बदल्या न करण्याचे धोरण आखले असताना मात्र सर्वत्र बदल्यांचे वारे वाहत आहेत. पेसा क्षेत्रात वर्षानुवर्ष प्रामाणिकपणे काम करणाऱ्या काही अधिकारी केंद्रप्रमुख आणि शिक्षकांना मात्र या बदल्यांपासून थांबविण्यात आले आहे. जनगणनेचे काम असतानाही इतर क्षेत्रात जोमाने बदल्या होत आहेत.

याउलट बदलीपात्र आणि जनगणने चे आदेश नसलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बदल्या शासनाने सचिवांच्या तोंडी आदेशाने थांबविल्याने अचंबा व्यक्त केला जात आहे. जनगणनेचे काम पूर्ण होईपर्यंत शिक्षकांच्या बदल्या न करण्याचे धोरण शासनाने आखले आहे. जे शिक्षक जनगणनेत नाहीत अशा पेसा सारख्या अवघडक्षेत्रात काम करणाऱ्या आणि बदलीपात्र शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बदल्या थांबविल्याने शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष धगधगत आहे. जनगणनेचे काम नको, अशी राज्यभर शिक्षक कर्मचाऱ्यांकडून मागणी होत असताना बदलीपात्र महाभाग शिक्षकांनी पेसा क्षेत्रात बदल्या होऊ नये यासाठी जनगणनेचे काम मुद्दामहून मागून घेतले आहे. राज्य शासनाच्या महसूल नगर विकास आणि आदिवासी विभागाअंतर्गत राज्यभर सध्या मोठ्या प्रमाणात बदल्या सत्र सुरू आहे.

केवळ शिक्षकांच्या बदल्या करण्यास शासनाने नकार दिला आहे. शासनाने या संदर्भात अंतर्मुख व्हावे, अशी मागणी शिक्षकांनी केली आहे. जे शिक्षक जनगणनेच्या कामात आहेत आणि ज्यांना हे काम शासनाने दिले




नाही तसेच बदलीस पात्र असतानाही शिक्षकांच्या बदल्या शासनाने एकतर्फी थांबविल्या आहेत.

ही बाब शिक्षकांवर अन्याय करणारी आणि गंभीर स्वरूपाची आहे. याबाबत बदली पात्र शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. पेसासारख्या अवघड क्षेत्रात वर्षानुवर्ष इमाने इतबारे आणि प्रामाणिक काम करणाऱ्या तसेच जनगणनेचे आदेश नसलेल्या शिक्षकांच्या बदल्या थांबवून शासन शिक्षकांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय केला आहे.

शासनाने या संदर्भात प्रामाणिकपणे फेरविचार करून आपली नैतिकता सिद्ध करावी, अशी ही मागणी शिक्षकांनी केली आहे. जनगणनेचे आदेश नसलेल्या शिक्षकांना शासनाने तातडीने बदल्यांचे ठिकाण देऊन त्यांची होणारी गळचेपी, चेष्टा थांबवावी अशी मागणी बदली पात्र शिक्षकांनी केली आहे. पेसा क्षेत्रात आपली बदली होईल या भीतीपोटी ज्यांना जनगणनेच्या कामात स्वारस्य नव्हते अशा शिक्षक तसेच काही केंद्रप्रमुखांनी शक्कल लढवून जनगणनेचे काम शासनाकडून मागून घेतले आहे. यामुळे प्रामाणिक शिक्षकांवर शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे अनेक संकटांचा सामना करण्याची वेळ आली आहे. अजूनही वेळ गेलेली नसून तसेच शासनाच्या महसूल नगर विकास अशा सर्वच खात्यां मध्ये ज्यांना जनगणनेचे आदेश आहेत अशाही काही कर्मचाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत.

शासनाकडून शिक्षकांसंदर्भात बदल्या न करण्यासंदर्भातील धोरणात तातडीने बदल करण्यात यावा, पेसा क्षेत्रात काम करणाऱ्या बदलीपात्र अधिकारी केंद्रप्रमुखांना तातडीने बदल्यांचे ठिकाण देऊन शासनाने अन्याय दूर करावा, अशी मागणी शिक्षक केंद्रप्रमुख तसेच काही अधिकाऱ्यांनी केली आहे.

# धोंडा खाऊन परतणाऱ्या जोडप्यावर काळाचा घाला पती ठार पत्नी जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : सासुरवाडीला धोंडा कार्यक्रम आटोपून घरी परतणाऱ्या नवदाम्पत्यांची दुचाकी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रँकरला जाऊन आढळल्याने घडलेल्या अपघातात दुचाकीस्वार पती ठार तर पत्नी जखमी झाल्याची घटना मंगळवार ता. २ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास शिऊर बंगला - छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर स्वामीराज मंगल कार्यालय समोर घडली प्रमोद मच्छिंद्र आहेर वय. ३० रा. नारळा असे अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे तर पत्नी रूपाली आहेर ही जखमी झाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार प्रमोद व रुपाली हे नवदाम्पत्य आदिक मासानिमित् धोंडा खाण्यासाठी शेवता (ता. कन्नड) येथे चुलत सासरे यांच्या कडे गेले होते कार्यक्रम आटोपून ते आपल्या घरी परतत असताना शिऊर बंगल्याजवळ त्यांच्या एम. एच २० जी डी ०२०८ ही दुचाकी एम एच ०४ जी आर ११७५ क्रमांकाच्या ट्रेंकरला जाऊन आढळली या धडकेत दोघेही रस्त्यावर फेकल्या गेले दोघांनाही गंभीर दुखापत झाल्याने त्यांना प्रत्यदर्शी नागरिकांनी दवाखान्यात दाखल केले दरम्यान डॉक्टरांनी पती प्रमोद यास तपासून मृत घोषित केले.

तर गंभीर जखमीं असलेल्या रूपाली यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्याचे सांगितले.

### आहेर दांपत्याचे सुखी संसाराचे स्वप्न धुळीत मिळाले

मिळालेल्या माहितीनुसार प्रमोद आणि रुपाली यांचा दि ९ मे रोजी जवळी येथे मामाच्या गावाला विवाह झाला होता सुखी संसाराची स्वप्न पाहत असताना काळाने अचानक त्याच्यावर घाला घातला आणि आहेर दांपत्याचे एकमेकांच्या सोबतीने जगण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले.

# पिता-पुत्राची विकृत कृत्य

### अल्पवयीन नाती व सुनेच्या विनयभंगाचा गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : 'बिसलेरी आणण्याच्या' बहाण्याने अल्पवयीन नाती व सुनेचा विनयभंग करण्याचा धक्कादायक घटना समोर आली. तालुक्यातील भेर्डापूर येथील एका महिलेने श्रीरामपूर तालुका पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी बापू शंकरराव शेरकर (वय ४२, रा.भेर्डापूर ता.श्रीरामपूर), आकाश बापू शेरकर ( वय २१, रा.भेर्डापूर ता.श्रीरामपूर ) पिता पुत्राविरुद्ध गुन्हा दाखल केला.

आकाश बापू शेरकर या आरोपीस पोलिसांनी अटक केली.फिर्यादी महिलेने पोलिसाना सविस्तर दिलेली माहिती अशी की, महिला ही एका गावामधील रहिवाशी असून, दोन मुले, दोन सूना, नातवंडासह गेल्या १० वर्षांपासून राहत आहेत. ती मिळेल तिथे मोलमजूरी करून कुटूंबाची उपजीविका करतो, तिच्या सांगण्यावरून आरोपी बापू शेरकर गेल्या पंधरा दिवसापूर्वी सून ही पाणी भरण्याकरिता यांच्या घरासमोर असलेल्या हौदा गेली असता, त्याने तिला पाठीमागून मिठी मारली होती,त्यावेळी तेच प्रकरण मिटविण्यात आले होते.

त्यानंतर (दि.२६) मे रोजी माझ्या बहिणाच्या मुलाचे तेराव्याचा कार्यक्रम होता. त्यावेळी, दुपारी दीड वाजेच्या सुमारास माझ्या नातीस त्याने बिसलेरी पाण्याची बाटली आणण्याकरिता शेजारील किराणा दुकानाकडे पाठविले.तेव्हा ती तिकडे गेली असता मात्र काही क्षणात परत ओरडत घराकडे धावत



आली.त्यावेळी ती घाबरून गेलेली होती. त्याक्षणी तिला विचारले असता, बिसलेरी आणण्यासाठी दुकानाकडे पायी जात असताना तेथील नामक ओकार बर्डे यांच्या घरामध्ये बसलेला आकाश बापू शेरकर याने माझ्या नातीला हाक मारून बोलविले, तिची चड्डी काढण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पुन्हा ती घराकडे ओरडत पळत आली, तिने घडलेली हकीकत मला सांगितली. सदरच्या घडलेल्या प्रकाराबाबत तालुका पोलिसांना सविस्तर तक्रार दाखल केली.

याप्रकरणी त्या महिलेच्या सांगण्यावरून तालुका पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी बापू शंकरराव शेरकर, आकाश बापू शेरकर (रा.भेर्डापूर) या दोघा पिता -पुत्राविरुद्ध भादंवि (बी.एन. एस) २०२३, कलम ७४, बालकांचे लौगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२, (८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तालुका पोलीस निरीक्षक अरूण धनवडे हे करित आहे.

## केंद्र सरकारचा खत ऑनलाइन बुकिंगचा पथदर्शी प्रकल्प

### जिल्ह्यात ५ जूनपासून राबविण्यात येणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : महाराष्ट्रात कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यात केंद्र सरकारचा National framework for fertilizer sale app या नावाने शेतकऱ्यांसाठी खत ऑनलाईन बुकिंग हा पथदर्शी प्रकल्प ५ जून २०२६ पासून राज्यात सुरुवात होत आहे. या संदर्भात कृषी विभागाकडून प्रचार व प्रसिद्धी सुरू आहे. सदर पमध्ये शेतकऱ्यांनी षरीाशी खऊ वापरून ऑनलाइन खताची बुकिंग करायची आहे. जमिनीच्या क्षेत्राचा तपशील, पिकांचा तपशील,खतांची निवड, किरकोळ खत विक्रेत्यांची निवड ही माहिती भरल्यानंतर टठ उेवश किंवा टोकन नंबर तयार होईल. सदरचा टठ उेवश हा जनरेट झाल्यापासून ३ दिवसांपर्यंत वैद्य राहणार आहे.सदरचा टठ उेवश किंवा टोकन नंबर संबंधित कृषी सेवा केंद्रावर दाखवल्यानंतर नोंदणी केलेले खत एईंी मशीनद्वारे शेतकऱ्यांना वितरित होणार आहे. सदरचे प हे ५ जूनपासून सुरु होणार आहे. यापुढे ऑनलाईन खत बुक केल्याशिवाय खत विक्री होणार नाही. यासाठी कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी वैजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी,उप कृषी अधिकारी,मंडळ कृषी अधिकारी,गुण नियंत्रण निरीक्षक,कृषी मित्र व कृषी सेवा केंद्र मार्फत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना खत प बाबत अवगत करण्याविषयी प्रचार व प्रसिद्धीचे काम करण्यात येत आहे. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सदरचे प डाऊनलोड करून वापर करण्याविषयी तालुका कृषी अधिकारी वैजापूर, श्रीः व्यंकट ठक्के व कृषी अधिकारी तथा गुण नियंत्रण निरीक्षक(राज्य) श्रीः रविंद्र उराडे, जे. डी. वाघमारे (जिप)यांनी आवाहन केले आहे.